CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. ०५ एप्रिल २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३५६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# रिक्षा परवान्यांसाठी आता 'मराठी' सक्तीची

## ▶ मागील १० वर्षांतील परवान्यांची होणार सखोल फेरतपासणी;
## ▶ १ मे पर्यंत अहवाल सादर करण्याचे परिवहन मंत्र्यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०४ एप्रिल :** रिक्षांच्या परवानेवितरण प्रक्रियेत होणारी अनियमितता आणि बोगस कागदपत्रांच्या आधारे परवाने लाटणाऱ्यांविरुद्ध राज्य सरकारने आता कठोर पाऊले उचलली आहेत. रिक्षा परवाना हवा असेल, तर मराठी भाषा येणे अनिवार्य आहे, असे निर्देश देत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मागील १० वर्षांत दिलेल्या सर्व रिक्षा परवान्यांची सखोल पुनर्तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. विशेषतः मीरा-भाईंदर क्षेत्रातील कथित घोटाळ्याची गंभीर दखल घेत, या मोहिमेची सुरुवात याच भागातून होणार आहे.



वांद्रे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित राज्यातील परिवहन अधिकाऱ्यांच्या बैठकीत मंत्री सरनाईक बोलत होते. यावेळी त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला खडे बोल सुनावत १ मे पर्यंत संपूर्ण चौकशी अहवाल सादर करण्याचे कठोर निर्देश दिले. मीरा-भाईंदरचे आमदार नरेंद्र मेहता यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या संदर्भात पुराव्यांसह तक्रार केली होती. काही परदेशी नागरिकांनी (बांगलादेशी) स्थानिक प्रशासनाच्या संगनमताने बनावट रहिवासी दाखले मिळवून रिक्षा आणि टॅक्सी परवाने हस्तगत केल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केला होता.

तक्रारीनुसार, डाचकुलपाडा आणि मांडवीपाडा येथील रहिवासी असल्याचे भासवण्यासाठी 'अदानी पॉवर'ची वीज बिले सादर करण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात या भागात 'टाटा पॉवर'तर्फे वीज पुरवठा केला जातो, हे मेहता यांना पुराव्यासह समोर आणले. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, मीरा-भाईंदर परिसरात एक विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. महिनाभराचा विशेष कॅम्प आयोजित करून प्रत्येक कागदपत्राची बारकाईने छाननी केली जाईल, अशी माहिती मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

**...तर परवाना रद्द करणार**

मोटार परिवहन नियमांनुसार परवानाधारकाला मराठी येणे बंधनकारक आहे. ज्यांना मराठी येत नाही, त्यांचे परवाने रद्द होऊ शकतात. फेरतपासणीत रहिवासी दाखले आणि वीज बिलांची सत्यता पडताळली जाईल. चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या आरटीओ अधिकाऱ्यांचीही गय केली जाणार नाही,



असे संकेत परिवहन मंत्र्यांनी दिले आहेत. या मोहिमेसाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त अधिकारी आणि कर्मचारी तैनात करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. मीरा-भाईंदरनंतर ही तपासणी मोहीम राज्यभर राबविली जाण्याची शक्यता आहे.

## बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०४ एप्रिल :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पश्चात राजकीय मतभेद बाजूला ठेवून बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, अशी भूमिका राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी मांडली. सुनेत्राताईंना सर्वच पक्षांनी पाठिंबा देऊन महाराष्ट्राची राजकीय संस्कृती जपण्याचे आवाहनही त्यांनी केले.

पोटनिवडणुकीच्या संदर्भात माध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले की, बारामती पोटनिवडणुकीत सर्वच पक्षांनी सुनेत्राताईंना पाठिंबा द्यावा, अशी माझी विनंती आहे. ही निवडणूक बिनविरोध होणे महाराष्ट्राच्या परंपरेला साजेसे ठरेल. यापूर्वीही आपण अशा निवडणुका बिनविरोध केल्या आहेत. माजी गृहमंत्री आर. आर. आबांच्या निधनानंतर झालेली पोटनिवडणूक भाजपने न लढण्याचा निर्णय घेतला होता. तोच मोठेपणा आताही सर्व पक्षांनी दाखवावा.

**रस्त्यांलगतच्या विहिरींचे 'ऑडिट' होणार**

नाशिकमधील दिंडोरी येथे झालेला अपघाताविषयी बोलताना मुख्यमंत्र्यांनी दुःख व्यक्त केले. ते म्हणाले, दिंडोरीची घटना सर्वांना प्रचंड वेदना देणारी आहे. भिंत मोठी असती तर



कदाचित जीव वाचू शकले असते. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आम्ही तातडीने कारवाईचे आदेश दिले आहेत. रहदारीच्या रस्त्यांवर अशा प्रकारच्या विहिरी जिथे कुठे असतील, तिथे तत्काळ उपाययोजना कराव्यात. जर संरक्षक भिंतीची उंची वाढवणे आवश्यक असेल, तर ते काम युद्धपातळीवर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पीडित कुटुंबाला तातडीची मदत घोषित करण्यात आली असून आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## गँगवारने नांदेड हादरले; एकाच वेळी तिघांचा खून

**तभा वृतसेवा**

**नांदेड, दि. ४ एप्रिल :** नांदेड शहरात काल शुक्रवारी मध्यरात्रीनंतर झालेल्या खुनी गँग वॉरमध्ये तिघांचा मृत्यू झाला. या घटनेत जखमी असलेल्या एकाला रुग्णालयात दाखल करत असताना एका मयताच्या भावाने चाकूने वार करून संपविले. नांदेडमधील साई लाला गँग आणि सदा गँग या दोन गँगमध्ये हे टोळीयुद्ध झाले. दोन्ही गँगमधील मयत आणि साथीदार हे सर्व पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. त्यांच्यावर हद्दपारी, एमपीडीए अंतर्गतही गुन्हे दाखल आहेत.

शुक्रवारी रात्री उशिरा अर्जितसिंह चव्हाण आणि त्याचे दोन साथीदार भारत ई-स्केअरमधून मधुरंदरफ हा चित्रपट पाहून बुलेटवर निघाले होते. यावेळी त्यांच्या मागावर असलेल्या साई लाला गँगचे सदस्य महमद अरबाज, सय्यद आवेज आणि त्यांचे साथीदार दबा धरून होते. चित्रपट पाहून थोड्या अंतरावर अर्जितसिंघ आणि त्याचे सहकारी आले असता त्यांना गाठून जीवघेणा हल्ला करण्यात आला. या



हल्ल्याचा अर्जितसिंघ आणि सहकाऱ्यांनी जोरदार प्रतिकार केला. यावेळी तलवार, चाकू आणि धारदार शस्त्रांचा वापर दोन्ही गँगमध्ये करण्यात आला. या हल्ल्यात सदा गँगचा अर्जितसिंह चव्हाण आणि साई लाला गँगचा महंमद अरबाज या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर आवेज आणि अन्य जखमींना विष्णूपुरी येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले होते. तिकडे शासकीय रुग्णालयात अर्जितसिंघ चव्हाण याचा भाऊ आणि वडीलही आले होते. गंभीर जखमी महंमद आवेज याला रुग्णालयात दाखल करत असताना अर्जितसिंह चव्हाण याच्या भावाने आवेजवर चाकूने वार केले. यात आवेजचा मृत्यू झाला. या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत चार जणांना ताब्यात घेतले आहे. आणखी आरोपींचा शोध सुरु आहे. या प्रकरणात मोठी धरपकड सुरू असल्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगीतले. या गँग वॉरच्या घटनेमुळे नांदेड शहरात खळबळ उडाली आहे. दरम्यान पोलीस दप्तरी या दोन्ही गँगच्या सदस्यावर गंभीर गुन्हे दाखल आहेत. मयत अर्जितसिंघविरुद्ध तब्बल नऊ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्याचवेळी साई लाला गँगचा अनिल पंजाबी हा मएमपीडीएफ्मध्ये तुरुंगात आहे. अर्जितसिंघविरुद्धही हद्दपारी, एमपीडीएची कारवाई केली होती. साई लालाही नुकताच तुरुंगाबाहेर पडलेला आहे.

## पाकिस्तानला मोठ्या संकटाचा सामना करावा लागणार?

### संयुक्त अरब अमिरातीकडून २ अब्ज डॉलर्सच्या कर्जाची परतफेड करण्याची मागणी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आर्थिक संकटाशी झुंजणाऱ्या पाकिस्तानला आणखी एक विनाशकारी बातमी मिळाली आहे. संयुक्त अरब अमिरातीने पाकिस्तानला दिलेल्या २ अब्ज डॉलर्स (सुमारे १६,५०० कोटी रुपये) कर्जाची तात्काळ परतफेड करण्याची मागणी केली आहे. मध्य पूर्वेत इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्र्वभूमीवर, ण-एचा हा निर्णय पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेसाठी एका मोठ्या धक्क्यापेक्षा कमी नाही.



पाकिस्तानचा परकीय चलन साठा वाढवण्यासाठी संयुक्त अरब अमिरातीने ही रक्कम स्टेट बँक ऑफ पाकिस्तानमध्ये सुरक्षित ठेव म्हणून ठेवली होती. आतापर्यंत, संयुक्त अरब अमिरातीने कर्जाची मुदत दरवर्षी वाढवली होती, ज्यामुळे पाकिस्तानला ही रक्कम त्वरित परत करावी लागत नव्हती. मात्र मिळालेल्या माहितीनुसार, आखाती प्रदेशातील युद्धसदृश परिस्थितीमुळे, संयुक्त अरब अमिरातीने या महिन्याच्या अखेरपर्यंत आपली रक्कम परत करण्याची विनंती केली आहे. विशेष बाब म्हणजे, पाकिस्तान या ठेवीवर सुमारे ६ टक्के इतका मोठा व्याजदर देत होता. डिसेंबर २०२५ मध्ये मुदत संपणाऱ्या या कर्जाची मुदत सुरुवातीला एका महिन्याने आणि नंतर दोन महिन्यांनी, म्हणजेच १७ एप्रिलपर्यंत वाढवण्यात आली होती. आता, संयुक्त अरब अमिरातीने ही मुदतवाढ देण्यास स्पष्टपणे नकार दिला आहे. पाकिस्तानला या आर्थिक वर्षात एकूण १२ अब्ज डॉलर्सच्या परकीय कर्जाची मुदतवाढ करायची होती, ज्यामध्ये सौदी अरेबियाकडून घेतलेल्या ५ अब्ज डॉलर्स आणि चीनकडून घेतलेल्या ४ अब्ज डॉलर्सच्या कर्जाचा समावेश आहे.

पाकिस्तानकडे सध्या अंदाजे २१ अब्ज डॉलर्सचा परकीय चलन साठा आहे. तांत्रिकदृष्ट्या, पाकिस्तान हे २ अब्ज डॉलर्स परत करण्यास सक्षम आहे, परंतु एवढ्या मोठ्या रकमेच्या बहिर्वाहामुळे त्याचा खजिना रिकामा होण्याच्या उंबरठ्यावर येईल. येत्या काही महिन्यांत, आपल्या इतर गरजा पूर्ण करण्यासाठी आणि जुनी कर्जे फेडण्यासाठी पाकिस्तानला नवीन बाह्य गुंतवणूक मिळवावी लागेल किंवा पुन्हा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे वळावे लागेल.

तज्ज्ञांच्या मते, संयुक्त अरब अमिरातीच्या या निर्णयानंतर सौदी अरेबिया आणि चीनसारखे इतर कर्जदार देशही त्यांचे पैसे परत मागू शकतात. असे झाल्यास, पाकिस्तानकडे दिवाळखोर होण्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही. आता संपूर्ण जग शहबाज शरीफ सरकारकडे पाहत आहे की ते आपल्या देशाला या आर्थिक त्सुनामीतून कसे वाचवतात.

### शशी थरूर यांच्या ताफ्यावर हल्ला; सुरक्षारक्षक जखमी, गुन्हा दाखल

तिरुवनंतपुरम (केरळ) : केरळ विधानसभा निवडणुक २०२६ च्या प्रचार मोहिमेदरम्यान, काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या ताफ्यावर हल्ला झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या हल्ल्यातून शशी थरूर थोडक्यात आणि सुखरूप बचावले असले, तरी त्यांच्या सुरक्षारक्षकाला (गनमॅनला) मारहाण करण्यात आली आहे. सुरक्षारक्षकाच्या तक्रारीवरून, वंडूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, तीन व्यक्तींना ताब्यात घेतलं आहे आणि दोन वाहनं जप्त केली आहेत. IANS या वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार, केरळमधील मलप्पुरम इथं एक तक्रार दाखल करण्यात आली आहे. काँग्रेसचे खासदार शशी थरूर हे वांडूर येथील एका निवडणूक प्रचार कार्यक्रमासाठी जात असताना, थिरुवल्ली चेलितोडू पुलाजवळ त्यांचा ताफा अडवण्यात आला, असा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.

## धुळ्यात वऱ्हाड घेवून जाणाऱ्या क्रुझरचा भीषण अपघात, चार ठार तर १२ जखमी

**तभा वृत्तसेवा**

**धुळे, दि. ०४ एप्रिल :** तामसवाडी येथे लग्नकार्यासाठी जाणाऱ्या वऱ्हाडींच्या वाहनाला अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातात चार जण जागीच ठार झाले असून, १२ जण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास क्रुझर (एमएच १८/ डब्ल्यू ६२२६) हे वाहन वऱ्हाडींना घेवून शिरडाणेहून तामसवाडीच्या दिशेने निघाले होते. तामसवाडीला लग्नमंडपात पोहचण्याआधीच त्यांच्या वाहनाला अक्कलपाडाजवळ असलेल्या पीरबाबानजीक अपघात झाला.

समोरुन हेलकावे खात येणाऱ्या वाहनाला वाचवण्याच्या प्रयत्नात क्रुझर उलटली. यात ३ जण जागीच ठार, तर एक जण उपचारादरम्यान दगावल्याची प्राथमिक माहिती आहे. यात १२ हून अधिक जण जखमी झाले आहेत. अपघातानंतर रुग्णवाहिका तातडीनं मदतीसाठी पोहचली होती. शिवाय सिव्हील सर्जन डॉ. रविंद्र सोनवणे हे देखील मदत कार्यासाठी धावून गेले. जखमींना उपचारासाठी साक्री रुग्णालय तसंच हिरे रुग्णालयात भरती करण्यात आले. या घटनेमुळे तामसवाडी आणि शिरडाणे गावात शोककळा पसरली आहे. दुपारी उशिरापर्यंत पोलिसांकडून अपघाताची नोंद घेतली जात होती.

## बाजारात बनावट आंब्यांचा सुळसुळाट; तब्बल २०० किलो बनावट आंबे जप्त

**तभा वृत्तसेवा**

**हैद्राबाद, दि. ०४ एप्रिल :** उन्हाळा सुरु झाला की स्वागत केलं जात ते फळांचा राजा आंब्याचं, कारण वर्षभरातून फक्त उन्हळ्यातच आपल्याला या आंब्यांची चव चाखता येते, त्यामुळे संपूर्ण बाजार पिवळ्या आंब्यांची भरून जातो. पण हेच पिवळे धम्मक आंबे आपल्या आरोग्यसाठी धोकादायक ठरू शकतात. असाच एक धक्कादायक प्रकार हैद्राबादमधून समोर आला आहे.

**हैद्राबादमध्ये प्रकार उघडकीस**

हैद्राबादच्या बाजारपेठेत बनावट आंब्याचा सुळसुळाट पसरला आहे, आणि आंबे खाल्ल्याने अनेक लोक आजारी पडत आहेत. या माहितीवरून पोलिसांनी अचानक धड टाकत एका फळ विक्रेत्याकडून तब्बल २०० किलो बनावट आंबे हे जप्त केले आहेत. हैद्राबाद पोलिसांनी कडक कारवाई करत एका रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.

**बनावट आंबे कसे पिकवले जातात?**

हाती आलेल्या माहितीनुसार हैद्राबाद खाद्य सुरक्षा अधिकारी आणि पोलिसांनी संयुक्तपणे शहराच्या विविध भागात छापे टाकून या रॅकेटचा पर्दाफाश केला या कारवाईदरम्यान अनेक धक्कदायक प्रकार उघडकीस आले. ग्राहकांच्या शरीराशी खेळले जाणारे आंबे हे कॅल्शिअम कार्बोइडसारख्या घातक रसायनांचा वापर करून आंबे पिकवले जात होते. पोलिसांनी घटनास्थळावरून २०० किलो आंबे आणि रसायनांची पाकिटे जप्त केली आहेत.

**असे आंबे शरीरासाठी किती धोकादायक**

रसायनांचा अति प्रमाणात वापर करून आंबे बाजारात विकले जात होते. कॅल्शियम कार्बोइडने पिकवलेले आंबे खाल्ल्याने घसा खवखवणे, पोटात दुखणे उलट्या आणि जुलाब यांसारखे त्रास होऊ शकतात. दीर्घकाळ अशा फळांचे सेवन केल्यास मज्जासंस्था आणि श्वसनाचा गंभीर आजारांचा धोका होऊ शकतो.

**प्रशासनाचे आवाहन**

उन्हाळात आंब्यांची मागणी ही वाढत



जाते. या वाढत्या मागणीचा फायदा घेऊन जास्त आणि लवकर पैसे कमवण्यासाठी फळ विक्रेते बनावट आंबे विकून ग्राहकांना फसवतात. आणि याचा परिणाम ग्राहकांच्या शरीराशी होतो. ग्राहकांनी फळे खरेदी करताना अधिक सावधगिरी बाळगावी काही संशयास्पद आढळ्यास त्वरित प्रशासनाशी संपर्क साधावा. असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.ग्राहकांनी फळे खरेदी करताना अधिक सावधगिरी बाळगावी आणि संशयास्पद वाटल्यास प्रशासनाशी संपर्क साधावा असेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच बाजारातील वाढत्या मागणीचा फायदा घेण्यासाठी व्यापारी अशा अनैतिक मार्गांचा अवलंब करत असल्याने कडक कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत.

## थोडक्यात...

### ताडोबाच्या नियमांचा आमदाराकडून भंग

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात सफारीदरम्यान मोबाईल वापरण्यावर सक्त मनाई असताना वरोरा येथील भाजप आमदार करण देवतळे यांनी नियमभंग केल्याची बाब समोर आली आहे. त्यांनी सफारीदरम्यान तयार केलेली एक 'रिल' सोशल मीडियावर पोस्ट केली असून त्या व्हिडिओमध्ये जिप्सीच्या आरशात मोबाईल स्पष्ट दिसत असल्याने त्यांनी मोबाईल वापरल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे ताडोबा प्रशासन सर्वसामान्य पर्यटकांप्रमाणे आमदारांवरही कारवाई करणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सोन्या-चांदीत मोठी घसरण

**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांत सोन्या-चांदीच्या दरांमध्ये मोठे चढ-उतार दिसून आले आहेत. आठवड्याच्या शेवटी दरात वाढ दिसली असली, तरी उच्चांकाच्या तुलनेत दोन्ही मौल्यवान धातू स्वस्त झाले आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया (चउद) वर २४ कॅरेट सोने १० ग्रॅमसाठी १,४९,६५० वर बंद झाले, तर चांदीचा दर २,३२,६०० प्रति किलोवर आला. यंदाच्या जानेवारी महिन्यात चांदीने ऐतिहासिक उच्चांक गाठत ४,३९,३३७ प्रति किलोचा स्तर ओलांडला होता. मात्र त्यानंतर दरात सातत्याने घसरण होत गेली. सध्याच्या २,३२,६०० दरानुसार चांदी अजूनही आपल्या उच्चांकापेक्षा तब्बल २,०६,७३७ प्रति किलो स्वस्त आहे. चांदीप्रमाणेच सोन्यालाही घसरणीचा फटका बसला आहे. जानेवारीत सोने २,०२,९८४ प्रति १० ग्रॅमपर्यंत पोहोचले होते. आता ते १,४९,६५० वर येऊन थांबले असून, उच्चांकाच्या तुलनेत सुमारे ५३,३३४ ने स्वस्त झाले आहे.

### विनय मांडकेंचं निधन, मुंबईत घेतला अखेरचा श्वास

**मुंबई :** संगीत विश्वातून एक दुःखद बातमी समोर येत आहे. प्रसिद्ध गायक विनय मांडके यांचे निधन झालं आहे. वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांचा दादर येथील त्यांच्या निवासस्थानी १ एप्रिल रोजी निधन झाले असल्याची माहिती आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक जिंगल्ससाठी आवाज दिला होता. विनय मांडके यांनी आपल्या कारकिर्दीत दीडशेहून अधिक चित्रपटांसाठी पार्श्र्वगायन केलं. तसेच सात हजारांहून अधिक जिंगल्स गायले. विशेष म्हणजे, हमारा बजाज या जिंगलमुळे त्यांना घराघरांत ओळख मिळाली. विनय मांडके यांच्या पश्चात पत्नी, सून, मुलगा आणि नातू असा परिवार आहे. दरम्यान, त्यांच्या निधनानंतर संगीत क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, त्यांच्या पार्थिवावर शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.

### साडेनऊ लाखांसह अख्खं एटीएमच पळवले

**जळगाव :** शहरातील अत्यंत गजबजलेल्या पोलन पेठ भागात शुक्रवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी पोलिसांच्या गस्तीला आव्हान देत 'इक्विटास स्मॉल फायनान्स बँक'चे चक्क एटीएम मशीनच लंपास केले. अवघ्या १० मिनिटांच्या थरारात ४ अज्ञात चोरट्यांनी २ लाख ५० हजारांचे मशीन आणि त्यातील ७ लाखांची रोकड, असा एकूण ९ लाख ५० हजारांचा ऐवज लंपास केला. या धाडसी घरफोडीमुळे जळगाव शहर पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

पोलन पेठेतील सत्यम प्लाझा इमारतीच्या तळमजल्यावर 'इक्विटास स्मॉल फायनान्स बँक'चे एटीएम केंद्र आहे. शुक्रवारी (दि. ३) पहाटे १.२५ ते १.३५ च्या सुमारास ४ अज्ञात चोरट्यांनी या ठिकाणी शिरकाव केला. अत्यंत सराईतपणे या टोळीने एटीएम मशीन उचकटले आणि थेट मशीनच सोबत घेऊन पोबारा केला. मशीनमध्ये १०० आणि ५०० रुपयांच्या नोटांच्या स्वरूपात ७ लाख रुपयांची रोकड एटीएम मशीन (२.५० लाख) + रोकड (७ लाख) = एकूण ९.५० लाख. असा मुद्देमाल घेऊन पसार झाले ही संपूर्ण कारवाई अवघ्या १० मिनिटांत उरकून चोरटे पसार झाले.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## टरबूजाचे दर घसरले, प्रति किलो ५ रुपयाने विक्री

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** जिल्ह्यात टरबुजाच्या वाढत्या आवकेमुळे बाजारभाव कोसळले असून शेतकऱ्यांना केवळ ५ रुपये प्रति किलो दराने माल विकावा लागत आहे. सध्या दररोज सुमारे ६० ते ७० टन टरबुजांची आवक होत असल्याने बाजारात मोठ्या प्रमाणात पुरवठा वाढला आहे. परिणामी मागणीपेक्षा पुरवठा जास्त झाल्याने दरात घसरण झाली असून शेतकऱ्यांना कवडीमोल भाव मिळत आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत हा दर अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.काही ठिकाणी वाहतूक खर्च परवडत नसल्याने टरबुज शेतातच टाकून देण्याची वेळ आली आहे.

यातच अवकाळी पावसाने परिस्थिती आणखी बिकट केली आहे. अचानक पडणाऱ्या पावसामुळे टरबुजांच्या गुणवत्तेवर परिणाम होत असून अनेक ठिकाणी पिके सडण्यास सुरुवात झाली आहे. पावसामुळे साठवण आणि वाहतूक व्यवस्थेवरही परिणाम होत आहे. त्यामुळे बाजारात येणाऱ्या टरबुजाची गुणवत्ता घसरल्याने दर आणखी कमी होत आहेत. या दुहेरी फटक्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

टरबुज पिकासाठी शेतकऱ्यांना बियाणे, खत, औषधे, मजुरी तसेच सिंचनासाठी मोठा खर्च करावा लागतो. अनेकांनी कर्ज काढून शेती केली आहे. मात्र सध्याच्या दरामुळे खर्चही निघत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. बाजारात व्यापाऱ्यांकडून कमी दर दिला जात असल्याने शेतकऱ्यांकडे पर्याय उरलेला नाही.



# परशुराम जयंतीनिमित्त समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन

## लातूरात परशुराम जयंतीची बैठकीत जोरदार तयारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** राजराजेश्वर भगवान परशुराम जन्मोत्सव सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने यंदाही उत्साहात साजरा करण्यात येणार असून हा उपक्रम आता तेराव्या वर्षात पदार्पण करत आहे. ज्येष्ठ विधीज्ञ अॅड. संजय पांडे यांनी सुरू केलेला हा उपक्रम गेल्या बारा वर्षांपासून सातत्याने राबवला जात आहे.यंदाच्या उत्सवात व्याख्यानमाला, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, महिलांसाठी विविध उपक्रम तसेच समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. भगवान परशुराम मंदिरात यज्ञयागाचाही विशेष कार्यक्रम होणार आहे. समाजातील सर्व घटकांनी वर्षातून एकदा एकत्र येत परशुराम जयंती साजरी करावी, असा समितीचा मनोदय आहे.

यावर्षी प्रथमच वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले डॉ. संतोष देशपांडे यांची अध्यक्षपदी निवड झाली असून त्यांच्या नेतृत्वाखाली आणि





ज्येष्ठांच्या मार्गदर्शनात मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरा करण्याचे नियोजन आहे. सध्याच्या सामाजिक परिस्थितीत संघटित राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत ब्राह्मण सेवा संघ, लोकमान्य टिळक विचार मंच, माध्व मंडळ (उत्तरादी मठ), लक्ष्मी नृसिंह बचत गट, समर्थ अन्न सेवा, विद्यावर्धिनी प्रतिष्ठान, परशुराम सेवा संघ, पेशवा युवा मंच, ब्राह्मण ऐक्य परिषद, इइछ ग्रुप, बॉन्ड ऑर्गनायझेशन, पुरोहित संघ तसेच विविध महिला गट आणि अन्य संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत ङ्गअमृत योजनाफची माहिती समाजातील उद्योजकाना देण्याचे ठरले. तसेच इइछ महिला व पुरुष उद्योजकांसाठी प्रदर्शन भरविणे, १०० रक्तदात्यांचा संकल्प, तरुणांचा सहभाग वाढवणे आणि सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान महिला मंडळाच्या वतीने आनंदाची बातमी देण्यात आली असून, लातूरमध्ये ब्राह्मवृंद परिवारासाठी विशेष शॉपिंग फेस्टिवल आयोजित करण्यात येणार आहे. या फेस्टिवलमध्ये इइछ समूहातील महिला व पुरुषांना त्यांच्या व्यवसायातील उत्पादने विक्रीसाठी स्टॉल लावण्याची संधी मिळणार असून हे इइछ मेंबर साठी स्टॉल पूर्णपणे मोफत असणार आहेत.स्टॉल बुकिंगसाठी अनुराधा औसेकर व धनश्री जोशी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जागा मर्यादित असल्याने लवकर नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.एकूणच, परशुराम जयंती निमित्ताने समाज एकत्र आणण्याचा आणि सामाजिक उपक्रमांना चालना देण्याचा मोठा प्रयत्न यंदा पाहायला मिळणार आहे. अशी माहिती जयंती समितीचे अध्यक्ष डॉक्टर संतोष देशपांडे यांनी दिली आहे.

## विविध वृत्त...

### अविनाश पाटील यांना कला गौरव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** आर्ट बिट्स फौंडेशन पुणे तर्फे संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवा कलावंतास दिला जाणारा ‘‘ कला गौरव‘‘ पुरस्कार या वर्षी युवा पिढीतील प्रसिद्ध



तबला वादक अविनाश पाटील यांना जाहीत झाला आहे.या संस्थेचे हे पंचविसावे वर्ष आहे. पाटील हे पं. प्रमोद पाटील व पं. उमेश मोघे यांचे शिष्य आहेत. तबला वादनात त्यांनी संगीत अलंकार व एम ए तबला ही पदवी सुवर्णपदकासह प्राप्त केली आहे. सवाई गंधर्व संगीत महोत्सवासह देशातील अनेक मानाच्या संगीत महोत्सवात त्यांनी आपली कला सादर केली आहे.

परदेशातील दुबई, अबुधाबी, मालदीव, नेदरलँड्स, जर्मनी, फ्रान्स, स्वत्झर्लंड, डेन्मार्क, जर्मनी, पोलंड, स्पेन, आयर्लंड, स्कॉटलंड आणी लंडन येथी सोलो तबला वादन सादर करुन जगभरातील संगीत रसिकांची दाद मिळवली आहे. पाटील यांनी कला क्षेत्रात स्व कर्तुत्वावर अतिशय चिकाटीने, कष्टाने, जिद्दीने, मेहनतीने संघर्ष करुन आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वताची वेगळी ओळख निर्माण केली आहे. भारतासह जगभरातील आज अनेक विद्यार्थी त्यांच्या कडे तबला वादनाची तालीम घेत आहेत.

### स्पोर्ट्स कोट्यातून अमर येमलेची पोलीस दलात दमदार एन्ट्री!



**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी अमर येमले याने मोठे यश संपादन केले आहे. स्पोर्ट्स कोट्यामधून त्याची नांदेड येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर नियुक्ती झाली असून, त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

अमर येमले हा महाविद्यालयाचा क्रीडाप्रेमी व मेहनती विद्यार्थी असून, अॅथलेटिक्स क्षेत्रात त्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याच्या या यशामुळे दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या शैक्षणिक व क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने आजवर विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांचे करिअर घडविले असून, चार्टर्ड अकाउंटंट, प्रशासकीय अधिकारी तसेच यशस्वी उद्योजक घडविण्याची गौरवशाली परंपरा कायम ठेवली आहे. अमर येमलेचे यश हे त्याच परंपरेचे उत्कृष्ट उदाहरण ठरत आहे. या यशाबद्दल महाविद्यालयात शुक्रवारी विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते अमर येमलेचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अशोक वाघमारे उपस्थित होते. अमर येमलेच्या यशामागे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अशोक वाघमारे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळेच अमरने हे यश संपादन केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## नूतन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी स्वीकारला पदभार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज (दि.०४) मावळत्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्याकडून पदभार स्वीकारला. श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी त्यांचे स्वागत केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे यांच्यासह अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## व्हव्ह सिझन ५ मध्ये चमकली गुणवत्ता!

### विद्या सूर्यवंशी ठरली ‘स्टुडंट ऑफ द इयर’; पायल जाधवला ‘लीडरशिप एक्सलन्स’ पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथे आयोजित ‘व्हव्ह सिझन ५’ या भव्य स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण १२२६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपल्या कौशल्याची झलक सादर केली. विद्यार्थ्यांमधील व्यवस्थापन कौशल्य विकसित करणे आणि त्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या स्पर्धेअंतर्गत ६ विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामधून उत्कृष्ट कामगिरी करणारे ८४ विद्यार्थी ‘स्टुडंट ऑफ द इयर’ स्पर्धेसाठी पात्र ठरले. अंतिम फेरीत एलिमिनेशन राऊंड, ग्रुप डिस्कशन आणि पर्सनल इंटरव्ह्यू अशा तीन टप्प्यांत तज्ञ परीक्षकांनी विद्यार्थ्यांची कसून चाचणी घेतली. या स्पर्धेत बी.कॉम. प्रथम वर्षातील कु. विद्या सूर्यवंशी हिने सर्वांगीण उत्कृष्ट कामगिरी करत ‘स्टुडंट ऑफ द इयर’ हा बहुमान पटकावला. तसेच बीबीएच्या कु. पायल जाधव हिला ‘लीडरशिप एक्सलन्स’




पुरस्काराने गौरविण्यात आले. या दोघींचा महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. परीक्षक म्हणून प्राचार्या डॉ. सुजाता चव्हाण आणि प्रा.डॉ. नरेश पिनमकर यांनी काम पाहिले. व्हव्ह समन्वयक डॉ. लक्ष्मीकांत सोनी यांनी प्रभावी नियोजन करून स्पर्धेला यशस्वी रूप दिले. प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. लक्ष्मीकांत सोनी, डॉ. आकांक्षा भांजी, प्रा. दगडू शेख, डॉ. प्रेमसागर मुंदडा, प्रा. स्नेहल पाटील, प्रा. ज्योती महावरकर, प्रा. क्षितिज कांबळे आणि प्रा. प्रसाद पाटील यांनी या स्पर्धे साठी विशेष परिश्रम घेतले.

यश हे एकाच दिवशी मिळत नाही, ते सातत्य, आत्मविश्वास आणि प्रत्येक संधीला दिलेल्या प्रामाणिक प्रयत्नांमधून घडतं. स्वतःवर विश्वास ठेवा आणि पुढे जात राहा. स्वतःमध्ये असणारे कौशल्य ओळखता आले पाहिजे. आलेल्या प्रत्येक संधीचं सोनं आपल्याला करता आलं पाहिजे. आत्मविश्वास हाच महत्वाचा पैलू आहे असे विद्या सूर्यवंशी म्हणाली.

## डॉ. अशोक पोद्दार यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** येथील प्रसिध्द अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अशोक पोद्दार यांचा ५५वा वाढदिवस विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, मोफत हाडांचा ठिसूळपणा तपासणी शिबिर आदी विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला.

डॉ. पोद्दार ऍक्सिडेंट ऍण्ड ट्रॉमा केअर सेंटरच्यावतीने मागील २८ वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या अंतर्गत जिल्हाभरात आतापर्यंत १७० मोफत आरोग्य शिबिरे घेण्यात येऊन रुग्णांना अल्प दरात औषधीचे वितरण करण्यात आले. दरवर्षी उन्हाळ्यात हॉस्पिटलसमोर पाणपोई सुरू करण्यात येते. शुक्रवारी डॉ. अशोक पोद्दार यांचा



वाढदिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त हॉस्पिटलतर्फे रुग्णांची मोफत हाडांच्या ठिसूळपणाची तपासणी करण्यात आली. राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच संकुलाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व अध्यक्षा के. ए. जायेभाये यांनी डॉ. पोद्दार यांचा सत्कार केला. यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, सामाजिक कार्यकर्ते अभिजीत देशमुख, आयएमएचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. अभय कदम, डॉ. दीपक गुगळे, डॉ. सुरेश भट्टड, डॉ. सुबोध सोमाणी, डॉ. विश्वास कुलकर्णी, जयेश बजाज, डॉ. प्रसाद उदगीरकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## सत्ताधाऱ्यांची निष्क्रीयता आणि प्रशासनाच्या बेजबाबदारपणामुळे लातूरकर पाण्यापासून वंचित

### नगरसेविका तथा भाजपा महिला आघाडी जिल्हाध्यक्षा शितल मालू यांचा आरोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०४ एप्रिल :** काही महिन्यापूर्वीच लातूर महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारादरम्यान लातूर शहराचे आमदार अमित देशमुख यांनी लातूरकरांना २४ तास व सात दिवस शुध्द पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाला भुलून लातूरकरांनी मनपाची सत्ता काँग्रेसच्या हाती दिली. मात्र सत्ता हाती येताच लातूरकरांना वायावर सोडण्याचे काम आ. अमित देशमुख यांनी केले आहे. सत्ताधायांच्या निष्क्रियतेमुळे आणि प्रशासनाच्या बेजबाबदारपणामुळे लातूरकरांना गेल्या चार दिवसांपासून पाणी टंचाईला सामोरे जावे लागल्याचा आरोप नगरसेविका तथा भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा शितल मालू यांनी केला आहे. लवकरात लवकर पाणी पुरवठा सुरळीत होवून शुध्द पाणी लातूरकरांना न मिळाल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शितल मालू यांनी दिला आहे.

लातूरकरांनी लातूर मनपा प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत करोडो रुपयांचा कर भरला असल्याचे सांगण्यात येत आहे. विशेष म्हणजे यावर्षीतर विक्रमी कर वसूली झाले असल्याचे प्रशासनाकडून सांगितले आहे. या कररुपी आलेल्या पैशातून लातूरकरांना नागरी सुविधा उपलब्ध करून देणे प्रशासनाचे कर्तव्य असल्याचे आठवण करून देत शितल मालू यांनी या पैशाच्या माध्यमातून पाणी पुरवठ्याचे वीजबिल का अदा करण्यात आले नाही, असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे. प्रशासनाचे उदासिन धोरण आणि त्याला मिळणारी सत्ताधायांची निष्क्रियतेची साथ यामुळे लातूरकरांना धरणात पाणी असूनही पाण्यापासून वंचित रहावे,लागत आहे. मनपा निवडणुक प्रचारादरम्यान मोठ मोठी आश्वासने देणारे शहराचे आमदार तथा काँग्रेस नेते अमित देशमुख यांनाही लातूरकरांशी काहीच



देणे घेणे नसल्याचे या माध्यमातून पुन्हा एकदा समोर आले आहे. आ. देशमुख यांनी या प्रकरणी लक्ष घालून महापौर व त्यांच्या टीमला सूचना दिल्या असत्या तर लातूरच्या पाणीपुरवठ्याची वीज खंडीत झाली नसती असा आरोपही शितल मालू यांनी केलेला आहे.

पाण्याच्या राजकारण करून निवडणुका नेहमीच लढविणाया काँग्रेसच्या मंडळींना इशारा देत शितल मालू यांनी लवकरात लवकर लातूर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होवून नागरिकांना शुध्द पाणी मिळाले नाही तर तिव्र आंदोलन करण्यात येईल, असेही स्पष्ट केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# परभणीत विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते थाटात उदघाटन

**मोठया प्रमाणात खेळाडूंचा सहभाग, ०५ एप्रिल रोजी होणार या स्पर्धेचा समारोप**




**परभणी,/प्रतिनिधी:-** तरुणांच्या चित्तथराराक खेळांनी गाजतोय क्रीडा महोत्सव
परभणीत विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते थाटात उदघाटन करण्यात आले होते.

परभणी,छत्रपती संभाजीनगर विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा-२०२६ चे आज पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते थाटात उदघाटन झाले. यंदा परभणी जिल्हयाला या स्पर्धेचे यजमानपद मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करत पालकमंत्री यांनी खेळाडुंना शुभेच्छा दिल्या. दैनंदिन कामाचा ताण-तणाव हलका होण्यासाठी खेळ आवश्यकच असून मानसिक आरोग्य आणि फिटनेससाठी प्रत्येकाने खेळ अवश्य खेळावा, असे आवाहन त्यांनी केले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या अश्वमेध मैदानावर तीन दिवस चालणाऱ्या या सोहळयात विविध क्रीडा स्पर्धा होणार आहेत. आज भव्य स्वरुपात व उत्साहपूर्ण वातावरणात या स्पर्धेचे उदघाटन झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा लता विजयकुमार वाकळे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मणी, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जालन्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, परभणीचे पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, विभागीय आयुक्त कार्यालयाचे सह आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, सह आयुक्त पुनर्वसन राजेश काटकर, अपर आयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले यांच्यासह विभागातील सर्व जिल्हयांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. प्रारंभी पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने स्पर्धेचे उदघाटन पार पडले. यानंतर ध्वजारोहण करण्यात आले. मशालीने क्रीडा ज्योत पेटविण्यात आली. विविध जिल्हयातून आलेल्या स्पर्धांकांनी अतिशय शिस्तबध्द पध्दतीने मान्यवरांना मानवंदना दिली. काही जिल्हयाच्या कर्मचाऱ्यांनी पारंपारिक वेशभुषेत मानवंदना दिली. सर्व स्पर्धकांना क्रीडा शपथ देण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी तयार केलेल्या स्मरणिकेचे विमोचन करण्यात आले. पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, सर्वसामान्यांच्या हितासाठी अधिकारी-कर्मचारी वर्षभर काम करीतच असतात. मात्र, काम करीत असताना शारिरिक व मानसिक आरोग्य चांगले राहण्यासाठी खेळ किंवा छंद जोपासणे आवश्यक आहे. अशा स्पर्धांमधून कर्मचाऱ्यांना एक नवी ऊर्जा मिळते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात अनेक लोकोपयोगी उपक्रम राबविले जातात. शंभर आणि दीडशे दिवसांच्या उपक्रमात विभागातील अनेक कार्यालयांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. अधिकारी, कर्मचारी यांच्या सकारात्मकतेमुळेच असे उपक्रम यशस्वी होतात, ही अतिशय समाधानाची बाब असल्याचे पालकमंत्री यांनी यावेळी सांगितले. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर म्हणाले की, दरवर्षी भरविण्यात येणाऱ्या या स्पर्धा एक कौटुंबिक सोहळाच आहे. राज्यात छत्रपती संभाजीनगर हा सर्वात मोठा विभाग आहे. सर्वसामान्यांच्या हितासाठी या विभागातील सर्वच अधिकारी , कर्मचारी सक्रीयतेने काम करतात. शासनाच्या अनेक योजना, उपक्रम प्रभावीपणे विभागात राबविण्यात येतात. ही निश्चितपणे समाधानाची बाब आहे. कर्मचाऱ्यांना या कामातून थोडा रिलिफ मिळावा म्हणून स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या सोहळयात सर्वांनी उत्साहाने सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. केंद्र शासनाचा क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २ एप्रिलपासून राज्यात साधना सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम आणि भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे. तरी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आयजीओटी () कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग-इन करून कोर्स पूर्ण करावेत, असे आवाहनही विभागीय आयुक्तांनी यावेळी केले. कुलगुरु डॉ. इंद्र मणी यांनी क्रीडा स्पर्धांमधून कर्मचाऱ्यांना नवी ऊर्जा व सकारात्मकता लाभते, असे सांगून सहभागी खेळाडुंना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी परभणी जिल्हयाला मिळालेल्या यजमान पदाबद्दल आभार व्यक्त करत स्पर्धेचे अतिशय चांगल्या पध्दतीने नियोजन करण्यात आल्याचे सांगून सर्व स्पर्धकांनी उत्साहाने आपल्या खेळाचे प्रदर्शन करावे, असे आवाहन केले. विभागातील सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना एकत्र आणणारा हा सोहळा मानसिक आरोग्य आणि आरोग्यदायी जीवनशैलीसाठी अतिशय कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांना अमेरिकेतील यु.एस. इंडिया एसएमई कौन्सिलचा ''आउटस्टँडिंग व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर'' हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांनी यावेळी पालकमंत्री यांचे अभिनंदन केले. निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी उपस्थितांचे आभार मानले. पारितोषिक वितरण व समारोप समारंभ दि. ५ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४.०० वा. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### ३१ मे रोजी 'संबोधी'द्वारे सर्वधर्मिय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन : २० मे पर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**परभणी,दि.०३(प्रतिनिधी) :** संबोधी अकादमी महाराष्ट्रच्यावतीने रविवार ३१ मे रोजी जिंतूर रस्त्यावरील महात्मा फुले विद्यालयात सर्वधर्मिय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सामूहिक विवाह सोहळ्यास देश-विदेशातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून, मंगल परिणय विधी पूज्य भदंत पय्याबोधी (नांदेड) व भिक्खू संघ यांच्या हस्ते संपन्न होणार आहे, अशी माहिती संबोधी अकादमीचे अध्यक्ष समाजभूषण डॉ. भीमराव हत्तीअंबीरे यांनी दिली.

संबोधी अकादमीच्या या उपक्रमातून आजपर्यंत ३५०० पेक्षा अधिक जोडपी विवाहबद्ध झाली आहेत. या विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या जोडप्यांना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत कन्यादान योजनेअंतर्गत रुपये २० हजारांचे अनुदान देण्यात येणार आहे. यासाठी वधू-वरांचा प्रथम विवाह असणे आवश्यक आहे. तसेच अकादमीच्या वतीने वधू-वरांना शुभ्र वस्त्र, सर्वांसाठी सुरुची भोजन, वाजंत्री आदी सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

इच्छुक वधू-वरांनी २० मे २०२६ पर्यंत संबोधी अकादमी, महाराष्ट्रचे कार्यालय, गाळा क्रमांक ६, सुपर मार्केट, कारेगाव रोड, परभणी येथे संपर्क साधावा. तसेच ७७९८५४४७८६ या मोबाईल क्रमांकावरही संपर्क करता येणार आहे. नोंदणीसाठी वधूचे वय किमान १८ वर्षे आणि वराचे वय २१ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. वयाच्या पुराव्यासाठी टी.सी., दहावीची सनद किंवा जन्म प्रमाणपत्र यापैकी एक कागदपत्र, चार पासपोर्ट फोटो, वधू किंवा वर यांपैकी किमान एका व्यक्तीचे जातीचे प्रमाणपत्र तसेच रहिवासी प्रमाणपत्र नोंदणी अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

अधिक माहितीसाठी अविनाश मालसमिंदर (मो. ७७९८५४४७८६) यांच्याशी संपर्क साधावा तसेच या विवाह सोहळ्यात जास्तीत जास्त जोडप्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन डॉ. भीमराव हत्तीअंबीरे, भगवानराव जगताप, डॉ. अरविंद सावते, शेषराव जल्हारे, सिध्दार्थ भराडे, गौतम साळवे, भीमराव पतंगे, शशिकांत हत्तीअंबीरे, बबन शिंदे, बाळासाहेब अंभिरे, डॉ. लक्ष्मण कांबळे, मुरलीधर ढेंबरे, ॲड. सुनिल बगाटे, बाळासाहेब किर्तने, विश्वनाथ डबडे, दि. फ. लोंढे, नवनाथ पैठणे, माधव मोते, गौतम कठाळे, राजेश चांदणे, एल. आर. कांबळे, भीमराव धबाले, राजेश पंडीत, बाबासाहेब भराडे, संतोष भराडे, संभाजी खिल्लारे, गंगाधर परसोडे, धनंजय रणविर, सोनाजी लांडगे, बाबासाहेब भुजावळे, दिपक जाधव, हेमंत घुगे, साहेबराव ढगे, उत्तम साळवे, अरुण पंचांगे, एकनाथ खंदारे, डॉ. नामदेव मुळे, प्रभाकर कांबळे, भीमराव श्रीखंडे, बंडू नरवाडे, सुर्यकांत उजगरे, सुरेश मगरे, बाबुराव गवळी, रोहिदास साखरे, गोमाजी श्रावणे, पवन कांडलीकर आदींनी केले आहे.

### परभणीत आज सकल हिंदू समाज संमेलन

**परभणी,दि.०३(प्रतिनिधी) :** भारत मातेप्रति विश्वास दर्शविण्यासाठी तसेच विश्वशांतीसाठी, संस्कृतीच्या संरक्षणासाठी रविवार ५ एप्रिल रोजी येथील रंगनाथनगर येथील वैष्णवी मंगल कार्यालयात सायंकाळी साडेपाच वाजता सकल हिंदू समाजाचे संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

या संमेलनात भागवताचार्य हभप दीपक महाराज वरणेकर व विश्वहिंदू परिषदेचे कार्यकारणी सदस्य सुनील रामपूरकर मार्गदर्शन करणार आहेत. या संमेलनासाठी रंगनाथनगर, अमेयनगर, बेलेश्वरनगर, प्रतापनगर, सेवकनगर, विद्यानगर, सरस्वतीनगर, पारदेश्वरनगर, लक्ष्मीनगर येथील नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संमेलन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### नर्मदा पायी परिक्रमा करणाऱ्यांचा परभणीत सत्कार; ग्रामीण भागातून उत्स्फूर्त प्रतिसाद

**परभणी,दि.०३(प्रतिनिधी) :** नर्मदा पायी परिक्रमा करणाऱ्यांना परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागातून मोठा प्रतिसाद मिळत असून, या परिक्रमेबद्दल जनजागृतीही वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. नर्मदा पदयात्री मित्र मंडळ, परभणी यांच्या वतीने श्री अरुण डहाळे यांच्या निवासस्थानी, शिवाजी नगर येथे २०२५-२६ या वर्षात नर्मदा पायी परिक्रमा पूर्ण केलेल्या परिक्रमार्थींचा सत्कार करण्यात आला.

'नर्मदा परिक्रमा एक आनंदानुभूती' या पुस्तकाचे लेखक चंद्रकांत लोखंडे यांनी प्रास्ताविक करत आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी डहाळे परिवारातील ज्येष्ठ सदस्य चंद्रेश्वरराव डहाळे यांच्या हस्ते प्रतिनिधी स्वरूपात सर्व परिक्रमार्थींचा पारंपरिक ओवाळणी व शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सत्कार करण्यात आलेल्या परिक्रमार्थींमध्ये गूंज (ता. वसमत) येथील बुधाजी नरवाडे, सुभाष शिंदे, उद्धव शिंदे, भगवान खटिंग तसेच झाडगाव (ता. परभणी) येथील सुभाष सूर्यवंशी, श्री सतीश पावडे आणि आर्किटेक्ट सतीश कुलकर्णी यांचा समावेश होता.

मागील दोन वर्षांपासून नर्मदा पायी परिक्रमेचा ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार होत असून, यंदा परभणी जिल्ह्यातील अनेकांनी या परिक्रमेचा संकल्प पूर्ण केला आहे. परिक्रमार्थींशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, ते वारकरी संप्रदायाशी निगडित असून दरवर्षी आळंदी ते पंढरपूर पायी वारी करतात. काळ्या मातीत शेती करत रोज २० ते २५ किलोमीटर चालण्याची सवय असल्याने परिक्रमेचा प्रवास त्यांना त्रासदायक वाटला नाही.

परिक्रमेदरम्यान साधा आहार, चांगली प्रकृती, कमी अपेक्षा आणि प्राप्त परिस्थितीत आनंदी राहण्याची वृत्ती यामुळे हा प्रवास सुखकर झाला. तसेच मार्गात येणाऱ्या आश्रम व सेवाभावी संस्थांकडून कोणतीही अपेक्षा न ठेवता उपलब्ध संसाधनांमध्ये मुक्काम करत, निसर्गाच्या ऋतूंचा सामना करत आणि भगवंताच्या नामस्मरणात रममाण होत त्यांनी ही परिक्रमा पूर्ण केली. या प्रवासाचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून येत होता. कार्यक्रमाच्या शेवटी श्री सत्यनारायण चांडक यांनी आभार व्यक्त केले.

### टेक एक्सेलरेट २०२६' विज्ञान प्रदर्शनात गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे दुहेरी यश

**परभणी,दि.०३(प्रतिनिधी) :** श्री शिवाजी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे दिनांक २९ व ३० मार्च रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय रोबोटिक चॅम्पियनशिप 'टेक एक्सेलरेट २०२६' अंतर्गत विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत गांधी विद्यालय माध्यमिकच्या विद्यार्थ्यांनी दुहेरी यश संपादन केले.

या स्पर्धेत सुमारे ७० संघांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी अंतिम फेरीसाठी १० संघांची निवड करण्यात आली होती. ३० मार्च रोजी झालेल्या बक्षीस वितरण समारंभात गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत आपली ठळक छाप उमटवली. गांधी विद्यालयातील स्वराज बालासाहेब खटिंग (इ.७ वी) व पृथ्वीराज बालासाहेब खटिंग (इ.५ वी) यांच्या 'इलेक्ट्रिसिटी सेव्हर' या प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला. या विजेत्या संघाला पारितोषिक प्राचार्य प्रा. डॉ. आनंद पाथ्रीकर, परीक्षक प्रा. डॉ. बी. जी. शिंदे व प्रा. डॉ. जमीरुद्दीन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

## समसापूर शिवारात अवैध फटाके निर्मिती अड्ड्यावर छापा; १.९१ लाखांचा मुद्देमाल जप्त : दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** तालुक्यातील समसापूर शिवारात एका अवैध फटाके निर्मिती करणाऱ्या अड्ड्यावर परभणी ग्रामीण पोलिसांनी छापा टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत फटाके निर्मितीसाठी वापरण्यात येणारे स्फोटक पदार्थ व रसायने असा एकूण १ लाख ९१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परभणी ग्रामीण पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार समसापूर शिवारातील गट क्रमांक ९४ मध्ये विनापरवाना फटाके निर्मिती सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार शुक्रवारी दुपारी सुमारे सव्वाचार वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी छापा टाकला. यावेळी घटनास्थळी संजय सदाशिव शिंदे (वय ५६) व सुदर्शन सदाशिव शिंदे (वय ४६, दोघे रा. लहुजीनगर, परभणी) यांना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत अवैध फटाके निर्मिती सुरू असलेल्या एकूण सहा खोल्यांची पंचासमक्ष झडती घेण्यात आली. झडतीदरम्यान ल्युमिनियम पावडर, काळी व पिवळी रासायनिक पावडर, सल्फर पावडर, ग्राउंड बोर्ड, सुतळी बॉम्ब, फ्युज बंडल, सुतळी, दोरी, तसेच विविध पॅकिंग साहित्य असा मोठ्या प्रमाणात स्फोटक साहित्य आढळून आले. याशिवाय तयार फटाके व त्यांचे पॅकिंग बॉक्सही जप्त करण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक मोहिते यांनी पंचासमक्ष सविस्तर जप्ती पंचनामा करून आवश्यक नमुने तपासणीसाठी घेतले. मुद्देमाल अत्यंत ज्वलनशील असल्याने तो घटनास्थळीच सीलबंद करून त्यावर सीलमोहोर करण्यात आली. ही कारवाई पोलीस निरीक्षक जीवन राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मोहिते, पोलीस नाईक अरविंद धबडे व पोलीस अंमलदार भिकाणे यांनी केली.

## पाथरी पंचायत समितीत विशेष स्वच्छता अभियान : अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त

**परभणी,/प्रतिनिधी-** स्वच्छता ही काळाची गरज ओळखून पंचायत समिती पाथरी येथे बुधवार १ एप्रिल रोजी विशेष स्वच्छता अभियान उत्साहात पार पडले. गटविकास अधिकारी ऋषिकेश सावंत यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.

या अभियानाअंतर्गत पंचायत समितीच्या मुख्य इमारतीसह विविध विभागांचा परिसर स्वच्छ करण्यात आला. कार्यालय परिसरातील गवत काढणे, कचरा संकलन करणे तसेच परिसर सुशोभित करण्याचे काम करण्यात आले. 'स्वच्छ कार्यालय, सुंदर कार्यालय' हा संदेश जनमानसात पोहोचवण्यासाठी सर्वांनी श्रमदान करत स्वच्छतेचा आदर्श निर्माण केला.

या मोहिमेची विशेष बाब म्हणजे गटविकास अधिकारी ऋषिकेश सावंत यांनी स्वतः हातात झाडू घेऊन स्वच्छतेची सुरुवात केली. त्यांच्या या कृतीमुळे कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आणि उपक्रम अधिक प्रेरणादायी ठरला. यावेळी संपूर्ण परिसर प्लास्टिकमुक्त करण्याची शपथही घेण्यात आली. स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचा संदेश यामधून देण्यात आला.

यावेळी बोलताना गटविकास अधिकारी सावंत म्हणाले की, शासकीय कार्यालय ही सार्वजनिक मालमत्ता असून ती स्वच्छ ठेवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. स्वच्छ वातावरणामुळे कामाचा उत्साह वाढतो आणि नागरिकांनाही सकारात्मक अनुभव मिळतो.

या स्वच्छता अभियानात सहायक गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी तसेच विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या उपक्रमात पशुधन अधिकारी डॉ. भागेश बसेट, बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती मंगल गायकवाड, विस्तार अधिकारी (कृषी) संदीपान घुंबरे, कु. अश्विनी लोंढे, श्रीमती अनूराधा जोशी, श्रीमती संध्या वडकुते, नंदकुमार सूर्यवंशी, सुमीत वाघमारे, अनंत चाकोते, जाधव, बोरकर आदी उपस्थित होते.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत राबविण्यात आलेल्या या अभियानामुळे पंचायत समिती पाथरीने स्वच्छतेचा आदर्श निर्माण केला आहे.

## जिंतूर : गोवंशाची अमानुष वाहतूक; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी:** गोवंशाची अमानुष वाहतूक; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिंतूर औंढा रोडवरील चामणी पाटीजवळ नऊ गोवंशांची अमानुष पद्धतीने वाहतूक करताना पोलिसांनी कारवाई करून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ३० मार्च रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. या प्रकरणी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय तुकाराम गुंगाणे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार शेख साजेद वाहब दिलु शाह (वय ३८, वसमत), गजानन गंगाधर राऊत (वय २६, पोतरा, ता. कळमनुरी) तसेच टेम्पो मालक (नाव अज्ञात) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम व प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यान्वये




गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी -४७ -२४५५ क्रमांकाच्या आयशर टेम्पोमध्ये नऊ गोवंशांना कोंबून त्यांच्या पायांना व तोंडाला दोरखंडाने घट्ट बांधले होते. त्यामुळे प्राण्यांना हालचाल करता येत नव्हती, तसेच श्वास घेण्यास अडचण निर्माण झाली होती. या अमानुष प्रकारामुळे गोवंशाची अवस्था गंभीर झाल्याचे दिसून आले. या कारवाईत अंदाजे ३ लाख ६० हजार रुपये किमतीचे नऊ गोवंश व सुमारे ८ लाख रुपये किमतीचा टेम्पो असा एकूण ११ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दाखल करणारे पोह लांडगे, पोलिस निरीक्षक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पुंड अधिक तपास करत आहेत.



## अग्रलेख...

# ममतादीदींचा तिळपापड

आसाम, केरळ, पुडुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या पाच राज्यांत विधानसभा निवडणूक होत आहे. यातील आसाम, केरळ आणि पुडुचेरीत ९ एप्रिलला एकाच टप्प्यात मतदान होत आहे. तामिळनाडूत २३ एप्रिलला एका टप्प्यात तर पश्चिम बंगालमध्ये २३ एप्रिल आणि २९ एप्रिल अशा दोन टप्प्यांत मतदान होत आहे. यातील पश्चिम बंगालची निवडणूक गेल्या काही दिवसांपासून सर्वाधिक चर्चेत आहे. पश्चिम बंगाल हे मुळातच अतिशय संवेदनशील राज्य आहे. आपल्या देशातील निवडणुका या प्रामुख्याने मनी पॉवर म्हणजे धनशक्ती तर मसल पॉवर म्हणजे गुंडागर्दीच्या भरवशावर लढल्या जातात हे उघड गुपित आहे. पश्चिम बंगालमधील आतापर्यंतची कोणतीच निवडणूक ही सुरळीत आणि शांततेत झाली नाही. राज्यातील प्रत्येक निवडणुकीला हिंसाचाराचे गालबोट लागते. हिंसाचार आणि त्यात काही निर्दोष आणि निरपराधांचा बळी गेल्याशिवाय त्या राज्यात निवडणुका झाल्यासारखे वाटतच नाही. २०११ पर्यंत राज्यात माकपची सत्ता होती. तो पक्ष सत्तेत असताना राज्यात मोठ्या प्रमाणात गुंडागर्दी होती. कायदा आणि सुव्यवस्था राज्यात माकपची सत्ता असतानाही नव्हती आणि आता तृणमूल काँग्रेसची सत्ता असतानाही ती नाही. पश्चिम बंगालमध्ये जनतेचे मतपरिवर्तन करून मतदान होण्याची पद्धत नव्हतीच. तेथे जनतेला धमकावून, जबरदस्तीने आपल्या बाजूने मतदान करवले जाते. पश्चिम बंगालमध्ये १५ वर्षांपासून तृणमूल काँग्रेसची सत्ता आहे. ममता बॅनर्जी राज्याच्या मुख्यमंत्री आहेत. त्या आक्रमक राजकारणासाठी ओळखल्या जातात. पश्चिम बंगालची माती आणि पाणी वेगळेच आहे. राज्यात कोणी अरे म्हटले तर त्याला कारे म्हणून उत्तर दिल्याने विषय संपत नाही. लोक एकमेकांच्या अंगावर धावून जातात. पश्चिम बंगाल आणि हिंसाचार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तेथे 'जिसकी लाठी उसकी भैंस' हाच न्याय चालत असतो. जो जेवढा आक्रमक आणि हिंसक, त्याचा तेवढा दबदबा राज्यात असतो.

पश्चिम बंगालमधील राजकारण विशेषत: निवडणुकीचे राजकारण हे गुंडागर्दीवर अवलंबून असते. त्यामुळे देशातील अनेक राज्यांत एका टप्प्यात विधानसभा निवडणूक होत असताना पश्चिम बंगालमध्ये मात्र आतापर्यंत तीन ते पाच टप्प्यांत विधानसभा निवडणूक घ्यावी लागत होती. यावेळी राज्यात प्रथमच दोन टप्प्यांत विधानसभा निवडणूक होत आहे. ती राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था स्थिती सुधारली म्हणून नव्हे तर निवडणूक आयोगाने ठाम आणि कठोर भूमिका घेतल्यामुळे.

मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या अर्थात एसआयआरच्या मुद्यावरून देशातील राजकीय वातावरण गेल्या काही दिवसांपासून तापविण्याचा प्रयत्न केला जात आहे. पश्चिम बंगालमध्ये तर हा मुद्दा निवडणुकीच्या आधीपासूनच स्फोटक झाला आहे. राज्याचा मुख्यमंत्री असो की देशाचा पंतप्रधान, त्यांना निवडण्याचा अधिकार राज्यातील आणि देशातील जनतेचा आहे. मतदारयादीत घुसखोरी केलेल्या परकीय नागरिकांना तो हक्क नाही. परकीय घुसखोरांची नावे मतदारयादीतून काढण्यासाठी विशेष सघन पुनरीक्षण अभियान जसे देशभरात राबविण्यात आले, तसेच ते पश्चिम बंगालमध्येही राबविण्यात आले. न्यायालयाच्या आदेशाने निवडणूक आयोग हे अभियान अतिशय प्रभावीपणे राबवत आहे. यात केंद्र सरकारची कोणतीच भूमिका नाही. निवडणूक आयोग ही घटनात्मक यंत्रणा आहे आणि ती थेट केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत नाही. मात्र एसआयआरच्या मुद्यावरून विरोधी पक्षांनी मोदी सरकारला जबाबदार धरत आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न चालवला आहे. आपल्या नागरिकत्वाचा पुरावा सादर करू न शकलेल्या काही लाख घुसखोरांची नावे मतदारयादीतून काढण्यात आली. एखाद्याचे नाव चुकीने मतदारयादीतून वगळण्यात आले असल्यास तो त्या निर्णयाला निवडणूक आयोगाकडे आव्हान देऊ शकतो. आपल्या नागरिकत्वाचे पुरावे सादर केलेल्यांची नावे पुन्हा मतदारयादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. ज्या लोकांनी घुसखोरी करून देशात प्रवेश केला आणि त्यांना नागरिकत्वाचा पुरावा सादर करता आला नाही, त्यांची नावे मतदारयादीतून कायमस्वरूपी वगळण्यात आली. ममता बॅनर्जी यांचा यामुळे तिळपापड झाला आहे. बांगलादेशी घुसखोर म्हणजे ममता बॅनर्जी यांचा हक्काचा मतदार आहे. राज्यातील काही लाख मतदारांची नावे मतदारयादीतून काढण्यात आल्यामुळे ममता बॅनर्जी यांच्या व्होट बँकेला मोठा धक्का बसला. बेकायदेशीर मार्गाने निवडणूक जिंकण्याच्या त्यांच्या मनसुब्यालाच सुरुंग लागला. त्याची प्रतिक्रिया तेथील रिवाजानुसार येते आहे. पश्चिम बंगालच्या मालदा जिल्ह्यात एसआयआरअंतर्गत काही मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यात आली, त्याला आव्हान देण्यात आले. निवडणूक आयोगाचे काही अधिकारी याची पडताळणी करत असताना बाहेर मोठा जमाव जमला. या न्यायिक अधिकाऱ्यांना भेटण्याची मागणी हा बेकायदेशीर जमाव करत होता, पण त्याला परवानगी न मिळाल्यामुळे जमावाने हा अधिकारी उपस्थित असलेल्या कार्यालयाला घेरले, त्यांना ओलिस धरले. यात काही महिला अधिकारीही होत्या. निवडणूक आयोगाच्या या अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याची जबाबदारी राज्य सरकारची म्हणजे स्थानिक प्रशासनाची होती. पण ममता बॅनर्जी सरकारने आपले हे घटनात्मक कर्तव्य पार पाडले नाही. कर्तव्यात गुन्हेगारी स्वरूपाचा निष्काळजीपणा केला. मालदा येथे बेकायदेशीर जमावाने जे केले, तो फक्त कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा नव्हता, तर न्यायव्यवस्थेला आव्हान देण्याचा प्रयत्न होता. हा सारा प्रकार ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसच्या चिथावणीतून घडविण्यात आला, यात शंका नाही. त्या बेकायदेशीर जमावात तृणमूल काँग्रेसचे गुंड मोठ्या संख्येत होते, अशी माहिती आहे. निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय सतर्क असल्यामुळे या अधिकाऱ्यांची सुटका झाली आणि त्यांचा जीव वाचला. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल सरकारवर जोरदार ताशेरे ओढले. या राज्यातील प्रत्येक जण राजकीय भाषा बोलतो आणि या राज्याचे देशात सर्वांत जास्त राजकीय ध्रुवीकरण झाले आहे, या शब्दांत सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी आपली नाराजी व्यक्त केली. निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय सतर्क नसते, तर या न्यायिक अधिकाऱ्यांच्या जिवावर बेतले असते, यात शंका नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार या घटनेची एनआयएमार्फत चौकशी करण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे. या चौकशीवर आम्ही देखरेख ठेवू, असे सांगत ६ एप्रिलपर्यंत या चौकशीचा प्राथमिक अहवालही सादर करायला न्यायालयाने सांगितले आहे. आम्ही कोणालाही कायदा हातात घेण्याची परवानगी देणार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. यावरून या घटनेने सर्वोच्च न्यायालय किती संतप्त झाले, याची आपण कल्पना करू शकतो. देशाच्या कोणत्याही राज्यात अशी घटना आजपर्यंत कधी घडली नाही, जी मालदा येथे घडली वा घडविण्यात आली. या घटनेची राजकीय किंमत मुख्यमंत्री म्हणून ममता बॅनर्जी यांना चुकवावी लागेल. सत्ता आपल्या हातातून जाते आहे, याची कल्पना आल्यामुळे ममता बॅनर्जी यांनी सर्व मर्यादा आणि ताळतंत्र सोडला, असे म्हणायला हरकत नाही. या घटनेत ममता बॅनर्जी यांची वागणूक मुख्यमंत्री म्हणून कमी तर तृणमूल काँग्रेसच्या नेत्या म्हणून जास्त होती. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेताना जी हमी त्यांनी दिली होती, त्याचे पालन त्यांनी केले नाही. दुसरी कोणतीही वेळ असती तर ममता बॅनर्जींना राजीनामा द्यावा लागला असता. पण आता मतदानाला फार कमी दिवस उरल्यामुळे त्यांचा राजीनामा घेण्यात काही अर्थ नाही. खरे तर आपल्या राजकीय फायद्यासाठी मर्यादा आणि ताळतंत्र सोडण्याची यापुढे देशातील कोणत्याच राज्याच्या मुख्यमंत्र्याची हिंमत होणार नाही, असा धडा ममता बॅनर्जी यांना शिकवला पाहिजे. तसे प्रत्यक्षात होईल ते जनमताच्या कौलातून. या देशात कायद्यापेक्षा आणि लोकभावनेपेक्षा कोणीही मोठा नाही, हा संदेश देणे आवश्यक आहे आणि तो जनमताच्या कौलातून मिळणार आहे. दीदींचा तिळपापड होतोय तो त्यामुळेच!

---

## प्रासंगिक

**नितीन गडकरी**

# अजातशत्रूची आठवण

**दत्ताभाऊंचा स्नेहभाव पक्षातीत होता. त्यामुळेच ते अजातशत्रू होते. राजकारणातले त्यांचे विरोधकही एका टप्प्यावर त्यांचे चाहते झाले ते त्यांच्या लाघवी व आपुलकीच्या स्वभावामुळे. विरोधकांशीही त्यांचे संबंध आत्मीयतेचे असायचे. आपल्यावर टीका करणाऱ्या नेत्यालाही गुपचूप आर्थिक मदत करणाऱ्या विरळा व्यक्तिमत्त्वाचे होते दत्ताभाऊ. त्यांच्यासाठी माणूस महत्त्वाचा होता, पक्ष नव्हे. दत्ताभाऊ म्हणजे असंख्य लोकांसाठी आधारवड होते. गेल्या काही वर्षांत आम्ही एकत्र येऊन ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे कार्य सुरू केले होते. त्या कार्याला दत्ताभाऊंचा फार मोठा आधार होता. त्यांचे मार्गदर्शन लाभायचे.**

माझ्यासाठी मोठ्या भावासारखे असलेले ज्येष्ठ नेते दत्ताभाऊ मेघे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या आठवणींचा पूर माझ्या मनात दाटून आला आहे. अतिशय लाघवी आणि सहयोगी स्वरूपाचे व्यक्तिमत्त्व दत्ताभाऊंना लाभले होते. ईश्वराच्या कृपेने त्यांच्या वाट्याला जी काही समृद्धी आली, त्यातील वाटा गरजूंना मिळत राहावा, यासाठी त्यांनी आयुष्यभर धडपड केली. राजकारणात राहूनही अजातशत्रू ठरलेले दत्ताभाऊ हे एक आगळेवेगळे रसायन होते. त्यांच्याशी एकदा जोडली गेलेली व्यक्ती त्यांच्यापासून कधीही दुरावत नसे.

दत्ताभाऊंच्या जीवनाची सुरुवात अतिशय गरीब कुटुंबातून झाली. सी. पी. ॲण्ड बेरार कॉलेजमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. उदरनिर्वाह चालविण्यासाठी आईसफ्रूट विकले. जुन्या पुस्तकांचे दुकान लावले. त्यानंतर काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणून काम केले. युथ कॅडर नावाची संस्था त्यांनी स्थापन केली. पुढे ते आमदारही झाले. शरद पवार साहेब पुलोदचे मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी त्यांच्यासोबत काँग्रेस सोडली. त्यांचा राजकीय प्रवास रोमहर्षक होता. शिवाय, एखादा सामान्य आणि गरीब माणूस आपल्या जीवनात किती मोठे काम करू शकतो, याचे मूर्तिमंत उदाहरण होते आमचे दत्ताभाऊ. लोकांसाठी शक्य ते सारे करत असताना त्यांनी आयुष्यभर सामाजिक बांधिलकी जपली. गोर-गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षणासाठी सढळ हाताने मदत केली. त्यांच्याकडे गेलेला गरीब माणूस कधीही निराश होऊन परतला नाही. सतत मदत करण्याच्या त्यांच्या दानशूर वृत्तीची तुलना करायची असेल तर कर्णाशी करावी लागेल. विशेषतः मंत्री असताना पक्षातील असो वा बाहेरचे असो, त्यांनी उत्तम व्यवहार केला.

गरिबांबद्दल कळवळा आणि संवेदनशीलता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. त्यांनी कायम लोकांचे हित साधण्याचा प्रयत्न केला. गरिबांची, उपेक्षितांची सेवा केली. राजकीयदृष्ट्या आपल्या बाजूचा आहे की विरोधातील आहे, याचा विचार न करता त्यांनी लोकांना मदत केली. त्याच काळात त्यांनी रविनगर सी. पी. ॲण्ड बेरार शाळेत फार्मसी कॉलेज सुरू केले. पुढे इंजिनीयरिंग कॉलेज, मेडिकल कॉलेज सुरू केले आणि खूप मोठे साम्राज्य उभे झाले.

दत्ताभाऊंनी राजकारण, शिक्षण, सहकार, समाजकारण अशा अनेक क्षेत्रांत आपला ठसा उमटवला.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख ही त्यांची दिलदारी आणि आपुलकी हीच होती. आयुष्याच्या एका टप्प्यावर दत्ताभाऊ राजकारणात आले. आमदार-मंत्री-खासदार वगैरे झाले. परंतु, त्यांनी असंख्य माणसांशी जोडलेले नाते बदलले नाही. संस्थात्मक कार्यात दत्ताभाऊ आघाडीवर होते. त्यांनी शिक्षण संस्थांचे जाळे निर्माण केले. त्यातून शेकडो लोकांना रोजगार दिला आणि गरीब-गरजू मुलांच्या शिक्षणाचीही सोय केली. त्यांच्या संस्था म्हणजे अनेक गरिबांसाठी संधीचे दार होते. कित्येक विद्यार्थ्यांनी मोफत किंवा अल्प फी देऊन शिक्षण घेतले.

दत्ताभाऊंचा स्नेहभाव पक्षातीत होता. त्यामुळेच ते अजातशत्रू होते. राजकारणातले त्यांचे विरोधकही एका टप्प्यावर त्यांचे चाहते झाले ते त्यांच्या लाघवी व आपुलकीच्या स्वभावामुळे. विरोधकांशीही त्यांचे संबंध आत्मीयतेचे असायचे. आपल्यावर टीका करणाऱ्या नेत्यालाही गुपचूप आर्थिक मदत



करणाऱ्या विरळा व्यक्तिमत्त्वाचे होते दत्ताभाऊ. त्यांच्यासाठी माणूस महत्त्वाचा होता, पक्ष नव्हे. दत्ताभाऊ म्हणजे असंख्य लोकांसाठी आधारवड होते. गेल्या काही वर्षांत आम्ही एकत्र येऊन ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे कार्य सुरू केले होते. त्या कार्याला दत्ताभाऊंचा फार मोठा आधार होता. त्यांचे मार्गदर्शन लाभायचे.

ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने व समाधानाने जगता यावे यासाठी आपल्याकडून जे काही शक्य होईल, ते केले पाहिजे, यासाठी त्यांनी अखेरपर्यंत धडपड केली. शाळेत जाऊ इच्छिणारे लहानगे जीव असोत की दुसऱ्या बालपणाचा अनुभव घेत असलेले ज्येष्ठ नागरिक असोत, दत्ताभाऊ असंख्य माणसांचे आधार होते. सतत लोकांची मदत करीत होते. अशा माणसांच्या जाण्याने निर्माण होणारी पोकळी कधीही भरून निघत नाही. ती पोकळी शिल्लक उरतेच आणि असा माणूस लोकांच्या स्मृतीत चिरंतन स्थान निर्माण करतो. माझा त्यांच्याशी दीर्घ काळ संपर्क आला. एक सुसंस्कृत राजकारणी, समाजाभिमुख लोकनेता आणि गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी धावून जाणारे एक महान व्यक्तिमत्त्व म्हणजे आमचे दत्ताभाऊ. माझे आणि त्यांचे मैत्रीचे नाते राजकारणाच्या पलीकडचे होते. आमचे कौटुंबिक ऋणानुबंध होते. त्यांच्या निधनामुळे आपण मोठ्या भावाला मुकल्याची माझी भावना आहे. त्यांच्या परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

(मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग भारत सरकार)

---

## वेध

**विजय कुळकर्णी**

# नवीन सहकार कायदा प्रस्थापितांना इशारा

बँकिंग कायदा अधिनियम २०२५ ची अंमलबाजावणी करण्याचा निर्णय राज्याच्या सहकार मंत्रालयाने घेतला आहे. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक किंवा विविध सहकारी बँकांच्या संचालक पदांवर ज्या संचालकांना १० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झाला, त्यांना आता पुढील निवडणुकीत अपात्र ठरविण्यात येणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश सहकार आयुक्तांना देण्यात आले आहेत. त्यामुळे राज्यातील विविध जिल्हा मध्यवर्ती बँका व विविध सहकारी बँकांच्या संचालक पदांवर मालकांप्रमाणे बसलेल्या सहकार क्षेत्रातील दिग्गजांचे खाते गोठविले जाणार आहे, म्हणजे त्यांना आता यापुढे या बँकांमध्ये संचालक होता येणार नाही.

या निर्णयामुळे जिल्हा सहकारी बँका व सहकार क्षेत्रातील खाजगी बँकांमध्ये वर्षानुवर्षे अनभिषिक्त सत्ता उपभोगणाऱ्या सहकार महर्षींचे वर्चस्व कमी होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा विचार केल्यास या बँकेचे अनेक संचालक १० वर्षे किंवा त्यापेक्षाही जास्त काळापासून संचालक आहेत. त्यापैकी अनेक संचालक तर, वडिलोपार्जित पद्धतीने संचालकपद भूषवीत आहेत. या नवीन नियमांप्रमाणे ते सर्व आता अपात्र ठरण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तसे झाले तर, आगामी निवडणुकीत नवीन नेतृत्वाला संधी मिळण्याची शक्यता आहे. या नवीन नियमांचा दीर्घकाळ संचालक राहिलेले राजकीय नेते, माजी पदाधिकारी आणि प्रभावशाली गटांना फटका बसणार आहे. त्याचबरोबर नव्या नेतृत्वाला संधी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. अनेक जिल्हा मध्यवर्ती बँकांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून एकाच गटाचे वर्चस्व कायम असल्याचे आपण पाहतो. नव्हे, या बँका म्हणजे राजकीयदृष्ट्या त्या राजकीय पक्ष आणि नेत्यांची शक्तिकेंद्रे बनली आहेत. वर्षानुवर्षे तेच ते संचालक मंडळ असल्यामुळे अनेक जिल्हा सहकारी बँकांमध्ये घोटाळे देखील झालेत. अनेक बँका दिवाळखोरीत निघाल्या. आजही त्यापैकी काही बँकांची स्थिती डबघाईस आलेली आहे. शेतकऱ्यांची सावकारी जाचातून सुटका करण्यासाठी कमी व्याजदरात पतपुरवठा करण्यासाठी या बँकांची निर्मिती झाली होती. पण, काही कालावधीनंतर या बँकांचा उपयोग आपली राजकारणातील पकड मजबूत करण्यासाठी संचालकांकडून होऊ लागला आणि बँक निर्मितीच्या मूळ उद्देशाला फाटा देऊन आपले राजकीय हितसंबंध जोपासण्यासाठी कर्ज वितरण करणे सुरू झाले. त्याचा फटका या बँकांमधील ठेवीदार, खातेदारांना झाला. बँका दिवाळखोरीत निघाल्याने अनेक ठेवीदारांना मोठ्या आर्थिक संकटांचा सामना करावा लागला. बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत जिल्हा परिषद कर्मचारी, शिक्षकांचे वेतन दिले जात होते. त्यामुळे अनेक शिक्षक, कर्मचाऱ्यांनी या बँकेत ठेवी ठेवल्या होत्या. बँक दिवाळखोरीत निघाल्याने त्यांच्या ठेवी अडकल्या. त्यामुळे अनेक खातेदार, ठेवीदारांना त्यांच्या मुला-मुलींच्या लग्नाला देखील वेळेवर पैसे मिळाले नाहीत. त्यामुळे आर्थिक पेच त्यांच्या व त्यांच्या कुटुंबीयांसमोर निर्माण झाला होता. त्यानंतर युती सरकारने या बँकेला निधी दिल्यामुळे ही बँक तरली. पण, आजही बँकेची स्थिती डामाडोलच आहे. याचे कारण, वर्षानुवर्षे तेच ते संचालक होते. आपले संचालकपद म्हणजे आपल्याला मिळालेले अढळ स्थान आहे, असे समजून संचालक वागत होते. त्यामुळे सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आज डबघाईस आल्या आहेत. तेव्हा, सहकार क्षेत्राची अशी हानी होऊ नये म्हणून हा कायदा करण्यात आला. या कायद्यामुळे नवीन चेहऱ्याला, युवा नेतृत्वाला सहकार क्षेत्रात वाव मिळेल, असे सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत असले तरी, त्यात फारसा बदल होण्याची शक्यता धूसरच आहे. कारण, आज ज्या संचालकांना दहा वर्षे झाली आहेत, ते बाजूला होतील आणि त्यांच्या जागी त्यांची पत्नी, मुलगी, मुलगा, भाऊ किंवा त्यांच्या परिवारातीलच व्यक्तीला संचालक करण्याचे प्रयत्न केले जातील. तेव्हा, या निर्णयामुळे फार काही बदल होण्याची शक्यता दिसत नाही. असे जर झाले तर, आज ज्यांचे या बँकांवर वर्चस्व आहे ते उद्याही कायम राहणार आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक लवकरच जाहीर होणार असल्याची चर्चा सहकार क्षेत्रात होत आहे. या नव्या नियमांमुळे ही निवडणूक चुरशीची होईल, असे वाटते. तर, १० वर्षांची मर्यादा घालण्याच्या नियमामुळे सहकार क्षेत्रात अधिक पारदर्शकता आणि नवीन नेतृत्व पुढे येण्याची अपेक्षा सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांना आहे. तसे जर झाले तर, सहकार क्षेत्राच्या विकास आणि विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब होईल. तेव्हा, या नव्या नियमांची अंमलबजावणी झाली आणि खरोखरच तरुणांना सहकार क्षेत्रात संधी मिळाली तर, त्याचा महाराष्ट्रातील सहकार चळवळ बळकट होण्यासाठी फायदाच होईल, हे नक्की!

८८०६००६१४९

---

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# बस्तर ते गडचिरोली 'रेड कॉरिडॉर'चा अस्त

महाराष्ट्र-छत्तीसगडच्या दाट जंगलांवर सूर्य मावळताना यंदा एक वेगळाच अर्थ उभा राहतो. तो केवळ दिवसाचा शेवट नाही, तर एका दीर्घकालीन अंतर्गत युद्धाच्या शेवटाच्या दाव्याचा क्षणाचा साक्षीदार ठरतो. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६ ही जी अंतिम मुदत दिली होती, ती फक्त प्रशासकीय लक्ष्य नव्हते, ती केवळ एक राजकीय घोषणा नव्हती, तर एक सुरक्षा रणनीती आणि एक स्पष्ट इशारा होता. नक्षलवादाचा शेवट, बस्तर ते गडचिरोली, 'रेड कॉरिडॉर'चा अस्त, जवळ आला असल्याचा.

लोकसभेत बोलताना अमित शाह यांनी ठामपणे सांगितले की, भारताची नक्षलविरोधी मोहीम अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. बस्तर जो एकेकाळी 'रेड टेरर'चे हृदय मानला जात होता. त्या 'रेड टेरर'च्या हृदयात मोठमोठ्याने धडधड वाढलेली मागील काळात बघितली. आत्मसमर्पणासाठी वेळ काय मागितली, टाळाटाळ काय केली, कारणं काय बनविली... पण गृहमंत्र्यांनी कसलीही दाद दिली नाही. 'डेडलाईन म्हणजे डेडलाईन', काहीही 'एस्क्युज' नाही. शेवटी काय धडाधड शस्त्र खाली टाकली गेली. 'कॅडर'मधील मोठमोठी नेतेमंडळी आत्मसर्पण करत गेली. नाहीतर धडक मोहिमेत मारली गेली. त्यामुळे आता अस्ताकडे वाटचाल ही अंतिम टप्प्यात आली आहे. हे निर्विवाद सत्य आहे.

नक्षलवादाचा इतिहास समजून घेतल्याशिवाय या अंतिम टप्प्याचा अर्थ कळू शकत नाही. १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबाडी येथे झालेल्या शेतकरी उठावातून या चळवळीची सुरुवात झाली. पण काही वर्षांतच ही ठिणगी मोठ्या आगीमध्ये रूपांतरित झाली. छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि मध्य भारतातील विस्तीर्ण जंगल पट्टा हळूहळू 'रेड कॉरिडॉर' म्हणून ओळखला जाऊ लागला. या भागात नक्षलवाद्यांनी केवळ विचारसरणीचा प्रसार केला नाही, तर समांतर सत्ताकेंद्र उभे केले. त्यांनी रस्ते उडवले, सुरक्षा दलांवर हल्ले केले, खंडणी उकळली आणि स्थानिक लोकांना त्यांच्या जाळ्यात ओढले.

त्याच्या उच्चांकावर १२६ जिल्हे या प्रभावाखाली होते. पण आज ही संख्या केवळ ११ वर आली आहे. त्यातील सर्वाधिक प्रभावित जिल्हे तर फक्त मोजके उरले आहेत आणि त्यात गडचिरोली अजूनही एक महत्त्वाचा बिंदू आहे.



गृह मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, नक्षलवादाचे क्षेत्र १८ हजार चौरस किमीवरून काहीशे चौरस किमीपर्यंत उरले आहे. हिंसक घटनांमध्ये जवळपास निम्मी घट झाली आहे. सुरक्षा दलांचे आणि नागरिकांचे मृत्यू लक्षणीयरीत्या कमी झाले आहेत. हे सर्व पाहता, अमित शाह यांचा अंतिम टप्पा हा दावा केवळ राजकीय भाषण नाही, तर आकडेवारीवर आधारित एक ठोस युक्तिवाद असल्याचे सिद्ध होते.

मात्र, गडचिरोलीकडे पाहिल्यास चित्र अधिक गुंतागुंतीचे दिसते. हा जिल्हा केवळ नकाशावरील एक बिंदू नाही. तो आदिवासी संघर्ष, संसाधनांवरील हक्क आणि राज्यव्यवस्थेच्या मर्यादांचा इतिहास आहे. गडचिरोलीत नक्षलवाद फोफावला कारण येथे विकासाचा अभाव, जमीनहक्कांचे प्रश्न आणि प्रशासनाची कमकुवत उपस्थिती होती. या पोकळीची संधी साधत नक्षलवाद्यांनी चंचू प्रवेश करून नंतर आपली जागा निर्माण केली होती. आता मात्र, आत्मसमर्पणांची संख्या वाढली आहे. अनेक 'कॅडर' शस्त्र टाकत आहेत. रस्ते, मोबाईल नेटवर्क, बँकिंग आणि सरकारी योजना पोहोचत आहेत. त्यामुळे समूळ नायनाट करण्याचा सरकारचा उद्देश सफल होण्याच्या मार्गावर आहे, या दाव्यात दम आहे.

**अमित शाहांचा आक्रमक दृष्टिकोन**

अमित शाह यांची रणनीती स्पष्ट आहे. नक्षलवादाला केवळ विकासाचा प्रश्न न मानता एक वैचारिक युद्ध म्हणून पाहणे. त्यांच्या मते, नक्षलवाद गरिबीतून जन्माला आलेला नाही, तर तो एक विचारपूर्वक रचलेला राष्ट्रविरोधी षडयंत्राचा भाग आहे. गृहयुद्ध, देशाच्या सुरक्षेला असलेला अंतर्गत धोका लक्षात घेता नक्षलवादाप्रति सरकारचा दृष्टिकोन अत्यंत आक्रमक आहे. यात कोणतीही तडजोड करण्यास सरकार तयार नाही. राष्ट्रीय सुरक्षेत कोणताही धोका पत्करायला सरकार तयार नाही. पण सरकारच्या आक्रमकतेपुढे आज बंदूक शांत झालेली उघडउघड दिसत असली तरी, ही विचारसरणी भूमिका बदलून पुन्हा वेगळी झूल पांघरूण मैदानात आली तर संघर्षाची व्याख्या बदलून पुन्हा या विचारसरणीशी लढा द्यायला सज्ज राहावेच लागणार आहे. गडचिरोलीसारख्या भागात, जिथे लोक आधीच वंचित आहेत, तिथे विश्वास निर्माण करणे महत्त्वाचे आहे. केवळ बंदुकीच्या जोरावर शांतता टिकत नाही. ती न्याय, संवाद आणि सहभागातून निर्माण होते. हे सरकारच्या लक्षात आलेच आहे. त्यासाठी गडचिरोलीच्या विकासावर भर देणारे निर्णय दणक्यात होतानादेखील दिसत आहेत.

आज देश नक्षलवादाच्या अंताच्या सर्वांत जवळ असू शकतो, पण हा शेवट आहे, असे समजून चालणार नाही. जंगलातील लढा कमी झाला असेल, रक्तरंजित संघर्ष कमी झाला असेल, पण 'अर्बन नक्षल' या अलिकडे प्रचलित झालेल्या चळवळीमुळे, विचारांचा संघर्ष अजूनही जिवंत असणार आहे. येथे बंदुका शांत होत असल्या, तरी प्रश्न अजूनही उभे आहेतच. अमित शाह यांनी दिलेली अंतिम मुदत कदाचित पूर्ण झाली असेल. पण खरी परीक्षा आता सुरू होते. विकास आणि लोकशाही यांचा समतोल राखण्याची. नक्षलवादावर विजय मिळवणे ही एक गोष्ट आहे. पण त्या विजयाला टिकवून ठेवणे आणि पुन्हा तोंड वर काढू न देणे, हीच खरी लढाई आणि हेच खरे आव्हान, भविष्यात ठरणार आहे.

९२७०३३३८८६


---

## वाचक पत्रे

### वाढता मानवी हिंसाचार आणि नैसर्गिक संकटे

आजच्या आधुनिक प्रगत जगात एकीकडे तंत्रज्ञान झपाट्याने पुढे जात आहे, तर दुसरीकडे समाजात मानवी हिंसाचार आणि नैसर्गिक संकटांचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढत आहे. ही दोन वेगवेगळी वाटणारी संकटे प्रत्यक्षात एकमेकांशी जोडलेली असून, मानवतेच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. मानवी हिंसाचाराच्या घटनांकडे पाहिल्यास, कौटुंबिक वाद, सामाजिक तणाव, जातीय द्वेष, तसेच आर्थिक असमानता यामुळे गुन्हेगारी वाढत चालली आहे.

राग, असहिष्णुता आणि स्वार्थ यामुळे माणूस माणसाचा शत्रू बनत आहे. सोशल मीडियाच्या प्रभावामुळे चुकीची माहिती आणि द्वेषपूर्ण विचार अधिक वेगाने पसरत आहेत, ज्यामुळे समाजात अस्थिरता निर्माण होते. दुसरीकडे, नैसर्गिक संकटेही दिवसेंदिवस तीव्र होत आहेत. अवकाळी पाऊस, दुष्काळ, पूर, उष्णतेची लाट आणि वादळे यामुळे शेती, अर्थव्यवस्था आणि सामान्य जनजीवनावर मोठा परिणाम होत आहे. या संकटांमागे मोठ्या प्रमाणावर मानवी हस्तक्षेप कारणीभूत आहे जंगलतोड, प्रदूषण, अनियंत्रित शहरीकरण आणि पर्यावरणाचा ऱ्हास ही त्याची प्रमुख उदाहरणे आहेत.



ही परिस्थिती केवळ पर्यावरणीय नाही, तर सामाजिक आणि मानसिक संकटाचेही लक्षण आहे. जेव्हा माणूस निसर्गाशी संतुलन राखत नाही, तेव्हा निसर्गही त्याला कठोर उत्तर देतो. त्याचप्रमाणे, जेव्हा माणूस आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवत नाही, तेव्हा हिंसाचाराचा उद्रेक होतो. या दुहेरी संकटावर उपाय म्हणून केवळ सरकारी धोरणे पुरेशी नाहीत, तर प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. शिक्षणामध्ये नैतिक मूल्ये, पर्यावरणाबद्दल जागरूकता आणि संस्कार यांचा समावेश करणे आवश्यक आहे. तसेच, समाजात संवाद वाढवणे, तणाव कमी करण्यासाठी मानसिक आरोग्यावर लक्ष देणे आणि निसर्गपूरक जीवनशैली स्वीकारणे ही काळाची गरज आहे. माणसाने माणुसकी जपली आणि निसर्गाचा सन्मान केला, तरच भविष्यातील संकटांना तोंड देता येईल.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

●● ●●

### राजकीय तडजोडीत संवैधानिक मूल्यांचा बळी नको!

आजच्या भारतीय राजकारणात 'युती' आणि 'आघाडी' हे कळीचे शब्द बनले आहेत. निवडणुका जिंकण्यासाठी, मतांचे विभाजन रोखण्यासाठी आणि पर्यायाने सत्ता मिळवण्यासाठी राजकीय पक्ष एकमेकांशी तडजोडी करतात. एखाद्या भागात एक पक्ष प्रबळ असतो, तर दुसरा दुबळा; अशा वेळी पक्षविस्तारासाठी अशा तडजोडी व्यावहारिकदृष्ट्या समजण्यासारख्या असल्या, तरी सत्तेचे वाटप करताना होणारी नैतिक तडजोड मात्र राज्यासाठी घातक ठरत आहे. सत्ता स्थापन झाल्यानंतर मंत्रिपदे आणि विविध महामंडळांच्या अध्यक्षपदांचे वाटप सुरू होते. अनेकदा मित्रपक्षांना खूश करण्यासाठी किंवा अंतर्गत नाराजी दूर करण्यासाठी या पदांची खिरापत वाटली जाते. मात्र, हे करताना संबंधित व्यक्तीची पात्रता आणि विशेषतः तिचे चारित्र्य तपासले जाते का? हा मोठा प्रश्न आहे. मंत्रिपदे किंवा संवैधानिक पदे ही केवळ शोभेची बाहुली नसून ती जनतेच्या कल्याणाची आणि न्यायाची केंद्रे असतात. अशा पदांवर बसणाऱ्या व्यक्तीचा भूतकाळ स्वच्छ नसेल, तर त्याचे दुष्परिणाम केवळ त्या खात्यालाच नव्हे, तर संपूर्ण सरकारला भोगावे लागतात.

अलिकडेच महिला आयोगासारख्या अत्यंत संवेदनशील संस्थेच्या सर्वोच्च पदावरील व्यक्ती संबंधितांच्या बातम्या भोंदूच्या प्रकरणात प्रसार माध्यमातून समोर आल्या. राज्य महिला आयोग ही पीडित महिलांना आधार देणारी, त्यांच्या हक्कांचे रक्षण करणारी संस्था आहे. जर या संस्थेची प्रमुखच विवेकहीन आणि अंधश्रद्धेच्या आहारी गेलेली असेल, तर ती अन्यायग्रस्त महिलांना न्याय कसा देणार? अशा वादग्रस्त नियुक्त्यांमुळे व्यवस्थेची विश्वासार्हता धुळीला मिळते. जेव्हा एखाद्या उच्च पदावरील व्यक्तीचे तसेच संवैधानिक पदावर बसणाऱ्या व्यक्तीचे चारित्र्य किंवा भ्रष्टाचाराची प्रकरणे उघड होतात, तेव्हा सरकारचे हसू होते आणि प्रशासकीय कामात अडथळे येतात. म्हणूनच, राज्य किंवा केंद्र सरकारने कोणतीही नियुक्ती करण्यापूर्वी संबंधित व्यक्तीच्या चारित्र्याची, सामाजिक प्रतिमेची आणि संपत्तीची सखोल चौकशी करणे अनिवार्य आहे. राजकीय सोयीसाठी लोकशाहीच्या मूल्यांचा आणि प्रशासकीय स्वच्छतेचा बळी दिला जाऊ नये. केवळ निष्ठा पाहून पदे वाटण्याऐवजी, त्या पदाची प्रतिष्ठा राखेल अशा चारित्र्यसंपन्न व्यक्तीची निवड करणे हेच सुशासनाचे लक्षण आहे. अन्यथा, सत्तेची समीकरणे जुळतीलही, पण जनतेच्या मनातील विश्वास मात्र कायमचा उडेल.

**अविनाश देशपांडे**/पुणे. ९४२२९५०७५०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच <u>कुठलाही लेख</u> पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# केज उपजिल्हा रुग्णालयात स्वच्छता अभियान



**केज दि ४(प्रतिनिधी)** | केज शहरालगत असलेल्या उपजिल्हा रुग्णालयात महिन्यातील पहिला शनिवार या स्वच्छता अभियान मोहीम अंतर्गत परिसराची स्वच्छता करण्यात आली. उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ दत्तात्रय केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा रुग्णालय परिसर स्वच्छ अभियान राबविण्यात आले.

स्वच्छता अभियानात मेट्रन श्रीमती पळशीकर, श्रीकृष्ण नागरगोजे , श्रीमती गवळी, श्रीमती जोगदंड ,श्रीमती भोपळे, श्रीमती साळवे, श्रीमती चव्हाण, श्रीमती गायकवाड, श्रीमती घुले, श्रीमती गिरी, श्रीमती पौळ,श्रीमती कराड,श्रीमती किवटे, श्रीमती सोनवणे,नासेर अली,श्री माळी,यांच्यासह आरोग्य कर्मचारी सहभाग नोंदवून रुग्णालय परिसर व उद्यान स्वच्छ केले. तेथील कचरा एकत्रित करून कचरा व्यवस्थापन करण्यात आले. राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानामुळे परिसर स्वच्छ व सुंदर झाला.

# गुणांसोबत हवी संस्कारांची जोड, यातून घडतो यशस्वी विद्यार्थी : प्रा.मोटेगावकर

## विद्यार्थ्यांच्या मानसिकतेनुसार पालकांनी दृष्टिकोन बदलावा ; डॉ.राजेश इंगोले

**तभा वृत्तसेवा**

**अंबाजोगाई** | राजश्री शाहू मल्टीपर्पज असोसिएशन, लातूर संचलित ढगेज् कोचिंग क्लासेस, अंबाजोगाई यांच्या वतीने आयोजित दहावी विद्यार्थी मार्गदर्शन, गुणवंत विद्यार्थी बक्षीस वितरण व आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अंबाजोगाईतील विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




या कार्यक्रमाला उदघाटक म्हणून लातूरच्या मोटेगावकर कोचिंग क्लासेसचे सर्वेसर्वा प्रा. मोटेगावकर तर प्रमुख व्याख्याता म्हणून सुप्रसिद्ध मानसोपचार व शिक्षण तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले उपस्थित होते, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.मिलिंद ढगे होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष गौतम बनसोडे, गणिताचे प्रा.धुळे तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सचिन आगलावे तसेच तालमार्तंड प्रा.राजकुमार ठोके यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी क्लासेसचे संचालक प्रा. डॉ.ढगे यांनी प्रास्ताविक करताना संकुलात राबविण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांचा सविस्तर आढावा घेतला. इंग्रजी ग्रामर, रेग्युलर इंग्रजी तसेच स्तरनिहाय लेवल झिरो, लेव्हल वन, लेव्हल टू व स्पोकन इंग्लिश या अभिनव पद्धतीतून विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक व वैज्ञानिक उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. महादेव गाढवे व प्रमोद सिताप हे गणित व विज्ञान हे विषय विद्यार्थ्यांमध्ये प्रभावीपणे रूजवत असल्याचे सांगितले. या उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोठा उपयोग होत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी संस्थेच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या नेटिजन्स प्री-प्रायमरी नॅशनल स्कूल, अंबाजोगाई या शाळेच्या प्रगतीचाही गौरवपूर्ण आढावा सादर करण्यात आला. यंदा सुरू होत असलेल्या इयत्ता पहिलीच्या वर्गामध्ये प्रवेश घेण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. आपल्या उदघाटकीय भाषणात डॉ.मोटेगावकर यांनी पालकांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांच्या प्रगतीत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले. प्रगती ही केवळ गुणांची आकडेवारी नसून ती संस्कारांची शिदोरी असली पाहिजे, असे ठामपणे सांगत त्यांनी पालक-विद्यार्थी व शिक्षक-विद्यार्थी नात्यातील दृढतेवर भर दिला. कष्टाने मिळालेल्या उत्पन्नाचा योग्य उपयोग करून विद्यार्थ्यांनी स्वतःची प्रगती साधावी, असे भावनिक आवाहन ही त्यांनी केले. प्रमुख पाहुणे तथा मार्गदर्शक व्याख्याते डॉ.राजेश इंगोले यांनी विद्यार्थ्यांच्या बदलत्या वयानुसार त्यांच्या बदलत्या मानसिकतेवर सखोल भाष्य केले. आपल्या पाल्याचा हा शारीरिक, मानसिक बदल, त्यांच्या मधील हॉर्मोनल बदलामुळे त्यांची वागण्याची, बोलण्याची पद्धत पालकांनी समजून घेतली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासात मागे राहण्यामागील विविध मानसिक कारणे सोप्या भाषेत विषद करीत त्यांनी पालकांनी आपल्या विचारसरणीत आवश्यक ते बदल करून विद्यार्थ्यांच्या मानसिक, भावनिक गरजांकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगितले. एखाद्या विद्यार्थ्याला अभ्यासात यश मिळावायचे असेल तर त्याला त्यात आवड निर्माण झाली पाहिजे, ही गोडी निर्माण करण्यासाठी पालकांनी, शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले पाहिजे. त्याला सकारात्मक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. अभ्यासात निर्माण झालेली आवड आणि अभ्यासातील सातत्य हीच खरी यशाची गुरूकिल्ली असल्याचे डॉ.इंगोले यांनी प्रतिपादन केले. या कार्यक्रमात आदर्श शिक्षक पुरस्कार सचिन सुमन शंकरराव आगलावे (श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालय, अंबाजोगाई) यांना प्रदान करून त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव गाढवे यांनी केले, तर आभार सौ.ढगे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री गाडवे, प्रमोद सिताप, श्रीमती के, श्रीमती कुलकर्णी, शितल साठे, श्रीमती साळुंखे, कु.सई व चि.प्रशांत ढगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विक्रमी बोलीने धारूर बाजार समितीचा लिलाव गाजला; जमा झाले 3 कोटी 22 लाख

**तभा वृत्तसेवा**

**किल्ले धारूर**| ( प्रतिनिधी) धारूर तालुका आणि परिसरातील व्यापारी तसेच नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नव्याने उभारलेल्या व्यापारी गाळ्यांचा लिलाव अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. या प्रक्रियेत व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला असून, अनेक गाळ्यांसाठी लाखो रुपयांच्या चुरशीच्या बोली लावण्यात आल्या. या लिलावातून एकूण ३ कोटी २२ लाख रुपयांची विक्रमी रक्कम संस्थेकडे जमा झाली आहे.



स्थानिक व्यावसायिकांना आधुनिक आणि सोयीस्कर पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बाजार समितीने या गाळ्यांची उभारणी केली होती. लिलावासाठी धारूरसह आसपासच्या भागातील व्यापाऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. काही गाळ्यांसाठी लागलेल्या चुरशीच्या बोलीमुळे रकमेने लाखांचा टप्पा सहज ओलांडला. संपूर्ण लिलाव प्रक्रिया संबंधित अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली अत्यंत पारदर्शक पद्धतीने राबवण्यात आली, ज्यामुळे उपस्थित व्यापाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

या महत्त्वपूर्ण प्रसंगी जिल्हा उपनिबंधक (बीड) तोटावार, सहायक निबंधक कासले, बाजार समितीचे सचिव दत्ता सोळंके, सभापती मंगेश तोंडे, उपसभापती सुनील शिनगारे तसेच संचालक संदीप शिनगारे यांची प्रमुख उपस्थिती होती. या नवीन गाळ्यांमुळे धारूर परिसरातील व्यापाराला मोठी चालना मिळणार असून, लहान व मध्यम व्यावसायिकांसाठी ही एक सुवर्णसंधी ठरेल, असे मत मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.

# तुलसी महाविद्यालयात भारतीय ज्ञान प्रणाली आणि संशोधन विषयावर ऑनलाईन चर्चासत्र संपन्न

**बीड (प्रतिनिधी)** | देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे आयोजित एक दिवसीय ऑनलाईन चर्चासत्र शनिवारी उत्साहात संपन्न झाले. 'भारतीय ज्ञान प्रणाली, बौद्धिक संपदा अधिकार आणि संशोधन पद्धती' या विषयांवर हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. योगिता लांडगे यांनी प्रास्ताविकातून चर्चासत्राच्या आयोजनामागील उद्दिष्ट स्पष्ट केले. यानंतर डॉ. विकास वाघमारे यांनी मान्यवर वक्ते व सहभागींचे मनःपूर्वक स्वागत केले.

चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात मुंबई येथील अमिटी युनिव्हर्सिटीचे डॉ. बाबासाहेब जोगदंड यांनी 'डिजिटल युगातील भारतीय ज्ञान प्रणाली' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी सांस्कृतिक पर्यटन व वारसा शिक्षणामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून परिवर्तन कसे घडवता येते, याबाबत सविस्तर विवेचन केले.

दुसऱ्या सत्रात छत्तीसगड येथील श्री शंकराचार्य प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे डॉ. संतोष कुमार यांनी 'संशोधन पद्धती आणि गुणात्मक डेटा विश्लेषण' या विषयावर मार्गदर्शन करत संशोधनासाठी उपयुक्त आधुनिक साधनांची माहिती दिली.

तिसऱ्या व अंतिम सत्रात आयआयआयटी वडोदरा आंतरराष्ट्रीय दीव कॅम्पसचे डॉ. विकास कुमार यांनी 'बौद्धिक संपदा अधिकार ' या विषयावर भाष्य करत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीसाठी आयपीआरचे महत्त्व अधोरेखित केले.

हे चर्चासत्र यशस्वी पार पाडण्यासाठी प्राचार्य डी जी निकाळजे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी तसेच आयक्यूएसी विभागाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. या ऑनलाईन उपक्रमाला विद्यार्थी व संशोधकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेस मार्च 2026 अखेर 3 लक्ष 12 हजार रुपये नफा

## अध्यक्ष सौ.सुनिता मोदी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**

**अंबाजोगाई** | अंबाजोगाईसह पंचक्रोशीतील महिलांचा आर्थिक स्तर उंचाविण्याच्या विधायक उद्देशाने केवळ महिलांनी महिलांसाठी साधारणता १० वर्षांपूर्वी सुरू केलेल्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेस ३१ मार्च २०२६ अखेर रूपये ३ लक्ष १२ हजार एवढा नफा झाल्याची माहिती पतसंस्थेच्या अध्यक्ष सौ.सुनीता राजकिशोर मोदी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.




आपला भारत देश हा पुरूषप्रधान संस्कृतीचा देश म्हणून जगात ओळखला जातो. असे असले तरीही आजची महिला ही पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून त्यांच्यासोबत उभा राहण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे नेहमी घर, चूल आणि मूल या मध्येच व्यस्त असलेल्या महिलांना काही प्रमाणात आर्थिक स्वायत्तता मिळवून देण्यासाठी व समाजातील महिलांचा आर्थिक स्तर उंचावून त्याचा फायदा कुटुंबाला व्हावा याच सकारात्मक हेतूने केवळ महिला भगिनींसाठी मागील अनेक वर्षांपासून सहकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनात क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात आल्याची माहिती पतसंस्थेच्या अध्यक्ष सौ.सुनीता राजकिशोर मोदी यांनी दिली. या पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहार व विकासाच्या दृष्टीने पर्यायाने अंबाजोगाई शहरातील महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी संस्थेच्या सचिव शोभा बाबू खडकभावी, तसेच संचालिका डॉ.रूपाली सुधीर धर्मपात्रे, संगीता विष्णू सरवदे, उषा गणेश मसने, अंजली विष्णुपंत मस्के, सविता विजय रापतवार, सुरेखा बाबुराव खंडाळे, परवीन नुजहत फारोखी, सायली सुहास मोहिते आणि जमुना जयप्रकाश चोकडा यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

# घरकूल योजना नागरीकांच्या हक्काची : नगराध्यक्षा गीताभाभी पवार

## जनता दरबार बैठकीत अडचणींवर झाली चर्चा

**तभा वृत्तसेवा**

**गेवराई दि. ३** | वार्ताहर : घरकूल योजनेंतर्गत मंजूर झालेल्या,नव्याने अर्ज दाखल केलेल्या आणि अर्ज दाखल केले नाहीत. अशा सर्व

घरकूल लाभधारकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी गुरुवार ता. ३ रोजी दु. ३ वाजता नगर परिषदेच्या सभागृहात जनता दरबार बैठकीत विविध विषयावर चर्चा करण्यात आली. शहरातील नागरिकांना घरकूल योजनेचा लाभ मिळवून देणे, हे नगर परिषदेचे कर्तव्य आहे. एकही पात्र माणूस घरकूल योजनेपासून वंचित राहू नये, यासाठी आम्ही सर्वजण मिळून प्रयत्न करत आहोत. शहरातील नागरिकांनी



शहर स्वच्छतेसाठी नगर परिषदेला सहकार्य करा, घरासमोर झाडे लावा, परीसरात स्वच्छता ठेवा

असे आवाहन नगराध्यक्षा सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांनी येथे बोलताना केले आहे.

गुरुवार ता. ३ रोजी दु. ३ वाजता नगर परिषदेच्या सभागृहात जनता दरबार बैठकीत विविध विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर उपनगराध्यक्ष रेवतीताई भगवान घुंबार्डे, गटनेते राजेंद्र राक्षसभूवनकर, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, नपचे सभापती, सर्व नगरसेवक उपस्थित होते. प्रधानमंत्री आवास योजना आणि शहराच्या विविध विकासकामांच्या संदर्भात एक महत्त्वाची आढावा बैठक उत्साहात पार पडली. नागरिकांनी घरकूल संदर्भात गाऱ्हाणी मांडली. त्यावर, सविस्तर चर्चा करण्यात आली. लाभार्थ्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यावर तात्काळ मार्ग काढण्याच्या सूचना नगराध्यक्षा पवार यांनी प्रशासनाला दिल्या. यावेळी शहरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री योगेश्वरी मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटीस 60 लाख 77 हजारांचा नफा

## अध्यक्ष रिकबचंद सोळंकी, उपाध्यक्ष शेख अन्वर शेख वली हसन यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**

**अंबाजोगाई** | सभासद, ठेवीदार आणि ग्राहकांना दर्जेदार सेवा देवून त्यांचा विश्वास संपादन करणार्या, पारदर्शक कारभार आणि अल्पावधीत प्रगतीपथाकडे यशस्वी वाटचाल करणारी, आपली हक्काची अर्थवाहिनी म्हणून सर्वत्र ओळखल्या जाणाऱ्या श्री योगेश्वरी मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटीस ३१ मार्च २०२६ अखेर ६० लाख ७७ हजारांचा नफा झाल्याची माहिती मल्टीस्टेटचे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी, उपाध्यक्ष शेख अन्वर शेख वली हसन यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिली आहे.

श्री योगेश्वरी मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटीवरील ग्राहकांच्या दृढ विश्वासाने ३१ मार्च २०२६ अखेरीस २८ कोटी ३३ लाख ६९ हजार रूपयांच्या ठेवींसह ६० लाख ७७ हजार रूपयांचा नफा मिळण्याचे कारण म्हणजे मल्टीस्टेटचे संस्थापक राजकिशोर मोदी यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि ग्राहक, ठेवीदार व सभासदांचा अतूट विश्वास असून यावरच आज या मल्टीस्टेटची यशस्वी वाटचाल सुरू असल्याची माहिती मल्टीस्टेटचे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी, उपाध्यक्ष शेख अन्वर शेख वली हसन यांनी यांनी प्रसिद्धीपत्रकातून दिली आहे. प्रसिद्धीपत्रकात श्री योगेश्वरी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटीची ३१ मार्च २०२६ अखेरची वित्तीय स्थिती पुढीलप्रमाणे मांडली आहे. यामध्ये मल्टीस्टेटकडे एकूण १७७१ एवढे सभासद असून, मल्टीस्टेटचे एकूण भाग भांडवल रूपये ७२ लाख ९० हजार एवढे आहे. मल्टीस्टेटचा स्वनिधी हा ३ कोटी ६४ लाख ८० हजार रूपये एवढा आहे. मल्टीस्टेटकडे सभासदांच्या एकूण ठेवी रूपये २८ कोटी ३३ लाख ६९ हजार एवढ्या आहेत. तर सभासद व ग्राहकांना ३१ मार्च २०२६ अखेर पर्यंत कर्ज वाटप रूपये १९ कोटी २६ लाख एवढे केले आहे. तसेच मल्टीस्टेटची अंबाजोगाई पिपल्स बँकेसह व अन्य ठिकाणची गुंतवणूक ही रूपये १५ कोटी ७८




लाख ७६ हजार एवढी असून ३१ मार्च २०२६ अखेर (आर्थिक वर्ष २०२५-२०२६) मल्टीस्टेटला रूपये ६० लाख ७७ हजार रूपयांचा नफा झाला आहे. श्री योगेश्वरी मल्टीस्टेट ही २०१४ साली अल्पशा गुंतवणुकीवर सुरू करण्यात आली होती. आज सभासद, ठेवीदार व ग्राहकांच्या अतूट विश्वासाच्या बळावर श्री योगेश्वरी मल्टीस्टेटने रूपये २८ कोटी ३३ लाख ६९ हजार ठेवींचा टप्पा गाठला आहे हे विशेष होय. अंबाजोगाई (महाराष्ट्र) आणि बसवकल्याण (कर्नाटक) या दोन राज्यात मल्टीस्टेटच्या शाखा आहेत. मल्टीस्टेटने सातत्याने हजारो छोटे, मोठे व्यावसायिक, हातगाडी, फेरीवाले, भाजीपाला व फळविक्रेत्यांना आर्थिक सहाय्य करून त्यांना त्यांच्या व्यवसाय वाढीसाठी आणि मागणीनुसार वेळोवेळी मदत करून त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी भक्कम पाठबळ दिले आहे. तसेच वेळोवेळी सभासदांच्या मुला-मुलींचे शिक्षण, विवाह, घर बांधकाम तसेच नवीन जागा खरेदी करण्यासाठी देखील मल्टीस्टेटकडून वेळोवेळी आर्थिक सहकार्य करण्यात आले आहे. श्री योगेश्वरी मल्टीस्टेट ही वेळोवेळी अर्थार्जनासोबतच अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात आघाडीवर असते. अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँक म.अंबाजोगाई ही बँक या मल्टीस्टेटची मातृबँक म्हणून कार्यरत आहे. श्री योगेश्वरी मल्टीस्टेट नांवारूपाला आणण्यासाठी मल्टीस्टेटचे सर्व ग्राहक, सभासद, ठेवीदार, कर्जदार, खातेदार, जामीनदार आणि हितचिंतक यांच्यासह संस्थापक मार्गदर्शक राजकिशोर मोदी, मल्टीस्टेटचे अध्यक्ष रिकबचंद बालचंदजी सोळंकी, उपाध्यक्ष शेख अन्वर शेख वली हसन, तसेच संचालक सुधाकर हरिश्चंद्र टेकाळे, ॲड.अनिल संभाजीराव लोमटे, विलास सिद्राम जाधव, अप्पासाहेब त्रिंबकअप्पा संकाये, ॲड.विलास शिवाजीराव लोखंडे, भागवत रामकृष्ण मसने, शेख मुख्तार फकीर अहमद, श्रीमती आशालता विश्वजित वांजरखेडकर, सौ.मंदाकिनी बाजीराव खडके, कांतीलाल नंदलाल शर्मा, सचिन लक्ष्मीकांत बजाज, मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष गोरोबा ढगे यांच्यासह शाखाधिकारी प्रदीप किरण काकडे, कर्ज अधिकारी विष्णु देविदास गुजर, रोखपाल उमेश अंबरूषी साखरे, लिपिक वैभव गोपाळराव देशमुख, शिपाई अंकुश अंबादास माने, मल्टीस्टेटचे पिग्मी प्रतिनिधी अनिल लिंबाजी काळे, संतोष विष्णुपंत चव्हाण आणि बसवकल्याण शाखेचे लिपिक संजीवकुमार सिद्रामअप्पा बिरादर यांचे मोलाचे सहकार्य लाभत असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# वाहक महिलेने प्रवासी महिलेचा घेतला चावा

**बीड**| अंबाजोगाई-अहमदपूर मार्गावरील बसमध्ये घाटनांदूरजवळ एका महिला वाहकाने प्रवासी महिलेचा चावा घेतल्याचा प्रकार घडला. या प्रकरणी महिला वाहकाने परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील पूस येथील महिला आपल्या नातवाला उपचारासाठी घाटनांदूर येथे घेऊन जात होत्या. त्यावेळी बसमधील वाहक महिलेसोबत त्यांचा वाद झाला. या वादावेळी महिला वाहकाने प्रवासी महिलेच्या हाताचा चावा घेतल्याचा आरोप प्रवासी महिला यांनी केला आहे. याचवेळी गळ्यातील पोतही गायब झाल्याची तक्रार त्यांनी केली आहे. प्रवासी महिलेने परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात येत तक्रार नोंदवली. पोलिसांनी त्यांना उपचारासाठी परळी उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. प्रत्यक्षात वाहक महिलेने चावा घेतला का, प्रवासी महिलेचा आरोप कितपत खरा आहे, याचा तपास परळी ग्रामीण पोलिस करत आहेत. महिला प्रवासी बसमधून उतरून घाटनांदूरच्या पोलिस चौकीमध्ये तक्रार दाखल करण्यासाठी गेली होती. परंतु, तेथून तिला परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात जाण्याचा सल्ला दिला.

# बीडला मिळाले अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक; नागेश चव्हाण रुजू

**बीड**| बीड जिल्हा रुग्णालयातील गेल्या दीड वर्षांपासून रिक्त असलेल्या अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक पदावर अखेर पूर्णवेळ नियुक्ती झाली आहे. बीडचे भूमिपुत्र असलेले आणि सध्या उदगीर (जि. लातूर) येथे वैद्यकीय अधीक्षक म्हणून कार्यरत असलेले डॉ. नागेश चव्हाण यांची या पदावर नियुक्ती झाली असून, गुरुवारी त्यांनी आपला पदभार स्वीकारला. डॉ. चव्हाण यांना प्रशासकीय कामाचा मोठा अनुभव आहे. यापूर्वी त्यांनी जळगाव आणि अहिल्यानगर येथे जिल्हा नियमित जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून काम पाहिले आहे तसेच २०२४ मध्ये बीडमध्ये याच पदावर असताना त्यांनी जिल्हा शल्यचिकित्सक पदाचा अतिरिक्त कार्यभारही यशस्वीपणे सांभाळला होता.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची धोरणे अल्पसंख्याक समाजापर्यंत पोहोचवा– नाझेर काझी

## हिंगोलीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अल्पसंख्याक संवाद दौरा




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**

अल्पसंख्यांक समाजाचे हित आणि हक्कांचे संरक्षण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानेच केले आहे. स्व. अजितदादा पवार यांनी नेहमीच अल्पसंख्यांक समाजाला न्याय देण्यासाठी कधीही तडजोड केली नाही. त्यामुळे अल्पसंख्यांक सेलच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आगामी काळात पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील अल्पसंख्यांक समाजपर्यंत पोहोचवावीत असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष ॲड नाझेर काझी यांनी केले. हिंगोली येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्यावतीने राज्यव्यापी अल्पसंख्याक कार्यकर्त्यांचा संवाद दौरा आयोजित करण्यात आला होता. शहरातील नगरसेवक शेख निहाल यांच्या जनसंपर्क कार्यालयात या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलतांना ॲड नाझेर म्हणाले की, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तळागाळातील अल्पसंख्यांक समाजाच्या समस्या जाणून घेवून त्या पक्ष श्रेष्टीपर्यंत पोहोचविल्या पाहीजते. स्थानिक पातळीवर त्यांच्या समस्यांचे निराकरण केले पाहीजे. त्यामुळे अल्पसंख्यांक समाजाचा विश्वास अधिक वाढेल. केंद्र आणि राज्यात आपली सत्ता आहे. त्यामुळे विविध योजनांचा लाभ अल्पसंख्यांक समाजाला मिळवून देण्यासाठी शहर, गाव पातळीपर्यंत प्रयत्न करणे आवश्यक आहे.

या संवाद दौऱ्याचा मुख्य उद्देश आगामी काळात पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील अल्पसंख्याक समाजापर्यंत पोहोचवणे आणि कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणे हा होता.

या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष हाजी सय्यद असदुल्ला कादरी, नगरसेवक शेख निहाल भैय्या, बाशिद मौला, मुजीब पठाण, शेख शकील, जावेद राज, कयुम पठाण आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी आणि हक्कासाठी राष्ट्रवादी काँग्रेस सदैव कटीबद्ध आहे. जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे आणि उपस्थित सर्व नगरसेवकांनी पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. या संवाद दौऱ्यामुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह पाहायला मिळाला.

# रोजगार व नवीन उद्योग उभारणीकडे विशेष लक्ष देणार– जिल्हाधिकारी

## जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासांवर भर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**

आगामी काळात रोजगार निर्मिती व नवीन उद्योग उभारणीवर विशेष लक्ष दिले जाणार असून त्यासाठी स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर करण्यात येणार असल्याचे माहीती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी समाज माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत दिली. यावेळी त्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासोबतच शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती मांडली. शुक्रवार दि ३ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी समाज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध प्रश्नांना उत्तरे देत जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन आणि प्रशासन काय करीत आहेत याची सखोल माहीती दिली. तसेच जिल्ह्याच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिती मांडली. प्रशासन, विकास आणि लोकसहभाग यांचा समतोल साधत जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या योजनांचीही माहीती दिली. यामध्ये प्रामुख्याने शासकीय योजनांमधून नागरिकांचा सक्रीय सहभाग वाढवून जास्तीत जास्त पात्र नागरिकांपर्यंत शासकीय योजनांची माहीती देऊन त्याचा लाभ देण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हिंगोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाची सकारात्मक भूमिका असल्याचेही ते म्हणाले. जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान, आरोग्य विषयक मोहीमा, समाज कल्याण विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहीती चित्ररथाद्वारे देण्यात आली आहे. या अभियानाला ग्रामीण भागात चांगला प्रतिसाद मिळत असून लोकांमध्ये जागरूकता निर्माण झाल्याचे दिसत आहे. तसेच सिंचन प्रकल्प, पायाभूत सुविधा विकासाच्या कामांद्वारे लोकाभिमुख सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. शेतकरी, महिला, आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी प्रशसान कटीबध्द असल्याचेही ते म्हणाले.

याशिवाय पर्यटन विकास, शेती क्षेत्रातील नव्या संधी, युवकांसाठी कौशल्य विकास आणि रोजगारनिर्मिती तसेच महिला स्वयंरोजगारासाठी स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर याबाबत प्रशासनाकडून विविध उपक्रम राबवले जात आहेत.

हिंगोली जिल्ह्यात महिलांनी उत्पादीत केलेल्या हळदीला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी मिळावी यासाठी हिंगोली गोल्ड हळदीचे ब्रँडींग करण्यात आले आहे. लोकप्रतिनिधी तसेच उच्च पदस्थ अधिकारी, सेलेब्रेटी यांना माहीती देऊन त्या त्या जिल्ह्यातून हिंगोली गोल्ड हळदीची मागणी नोंदविण्याची विनंती करण्यात आली आहे. याशिवाय महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू तसेच खाद्य पदार्थाना बाजारपेठ मिळवून देत शहरी व ग्रामीण महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम केले जाणार असल्याचे यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले.

# समग्र शिक्षा अभियानाचा निधी खर्च करण्यात शिक्षण विभाग नापास

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**

समग्र शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त झालेला २९ लाखांचा निधी खर्च करण्यात जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग नापास झाला आहे. हा निधी समग्र शिक्षा अभियानाकडे परत करण्यात आला आहे. इयत्ता दहावी व बारावी परीक्षा असल्यामुळे निधी खर्चाचे नियोजन झाले नसल्याचे कारण शिक्षण विभागाने दिले आहे. यामध्ये आविष्कार अभियान व विद्यार्थ्यांच्या अभ्यास दौऱ्याच्या निधीचा समावेश आहे.

राज्यात समग्र शिक्षा अभियानांतर्गत शिक्षणाधिकारी कार्यालयास विविध उपक्रमांसाठी निधी दिला जातो. यामध्ये शाळा दुरूस्ती, शाळा बांधकामे, संयुक्त शाळा अनुदान, दिव्यांग समावेशीत शिक्षण, याशिवाय विद्यार्थ्यांसाठी अभ्यास दौरा तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी आविष्कार अभियान राबविण्यासाठी निधी दिल्या जातो.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून उपलब्ध निधीतून शाळा दुरूस्ती व बांधकामाच्या कामासोबतच विद्यार्थ्यांच्या दौऱ्यासाठी मिळालेल्या निधीचे नियोजन करणे अपेक्षित असून सदर निधी खर्च करण्याबाबत स्पष्ट सूचना दिल्या जातात. निधी खर्च न झाल्यास त्याची कारणे नमुद करून निधी समग्र शिक्षा अभियानाकडे परत पाठविणे आवश्यक आहे. मात्र शिक्षण विभागाचे योग्य नियोजन नसल्यामुळे हा निधी आता समग्र शिक्षा अभियानाकडे परत पाठविण्यात आला आहे.

शिक्षण विभागाच्या कुचकामी नियोजनामुळे तब्बल २९ लाख रूपयांचा निधी परत गेला आहे. यामध्ये काही निधी खर्च होऊन शिल्लक राहील्यामुळे परत गेला तर विद्यार्थ्यांसाठी प्राप्त झालेल्या निधीचे दहावी व बारावीच्या परीक्षेमुळे नियोजन करता आले नसल्याचे कारण देत निधी परत करण्यात आला आहे. त्यामुळे राष्ट्रीय आविष्कार अभियान तसेच अभ्यास दौऱ्याला विद्यार्थी मुकले असल्याचे दिसत आहे. समग्र शिक्षा अभियान कार्यालयाने विद्यार्थी अभ्यास दौऱ्यासाठी २०८७ लाख रूपये तर आविष्कार अभियानासाठी ५०७५ लाखांचा निधी उपलब्ध केला होता. सदर दोन्ही निधी परत करण्याची वेळ शिक्षण विभागावर आली. याशिवाय इयत्ता अकरावी व बारावीच्या प्रयोगशाळेसाठी मिळालेला ४ लाखांचा निधी जिल्हा परिषद शाळेत सदर वर्ग नसल्याचे कारण दाखवून परत करण्यात आला आहे.



**हिंगोली– सध्या जिल्हाभरात हळदीच्या पिकांची काढणी युध्दपातळीवर सुरू असून सवड येथील एका शिवारात शेतकरी व शेतमजूर हळदीची काढणी करतांना दिसत आहेत. छाया– लखन यादव**

## संक्षिप्त वृत्त

### पर्यावरण पूरक जीवनशैलीचा जीवनात अंगीकार करावा– नीळकंठ गायकवाड



हिंगोली– प्रा. शा. मोरवड येथे विद्यार्थी, नागरिकांना संबोधित करताना निळकंठ गायकवाड यांनी पर्यावरण, परिसंस्था, ऑक्सिजन कार्बन डाय–ऑक्साइड चक्र,अन्नसाखळ्या,पर्यावरणातील प्रदूषण जल, वायू, मृदा, ध्वनी प्रदूषण याविषयी माहिती सांगून विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक जीवनशैलीचा अंगीकार करण्याचे आवाहन निळकंठ गायकवाड यांनी केले. पाणी ऊर्जा यांचा काटकसरीने वापर करून प्रत्येकाने दरवर्षी किमान दोन वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे जेणेकरून पृथ्वीचे ऋण आपण काही प्रमाणात फेडू शकू. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक बी.एस. असोले, तर प्रमुख पाहुणे म्हणून आर.जे. सोनवणे,आर. टी. गलांडे, डी. एल.वंजारे, एन. एस. रागीट तसेच नागपुरे, एस. पी. ए. एन. पवार हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोनुने आर.जे यांनी केले तर आभार प्रदर्शन वंजारे यांनी केले. याप्रसंगी गावातील विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अवकाळी पावसाचा हळदीला फटका

हिंगोली– जिल्ह्यातील हिंगोली तालुक्यासह सेनगाव तालुक्यातील साखरा, गोरेगाव, सेनगाव आदी भागांमध्ये दि ३ एप्रिल मध्यरात्री वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस तर काही ठिकाणी गारपीट झाली. सध्या जिल्हाभरात हळद काढणीचे काम मोठ्या जोमाने सुरू आहे. शेतकऱ्यांनी त्यांची हळद काढून ठेवली असतांना अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे हळद भिजली असून मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. तसेच केळी, आंबा, पपई आदी फळबागांचेही वादळी वारा व अवकाळी पावसामुळे आतोनात नुकसान झाले आहे. एप्रिल मध्ये जिल्ह्यात दोन ते तीन वेळा अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी हवालदिल झाला असून शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान झाले आहे. प्रशासनाने तत्काळ नुकसानीचे पंचनामे करावेत तसेच शासनाने तत्काळ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे. तर दुसरीकडे अवकाळी पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळीत होत आहे. अचानक येणाऱ्या पावसामुळे छोट्या व्यापाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे.

### ६७ वाहन चालकांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६७ वाहन चालकांवर पोलिस विभागाने कारवाई करीत वाहन चालकांकडून ६१ हजार ४०० रूपयांचा दंड वसूल केला आहे. अवैध दारू विक्री करणाऱ्या एका ठिकाणावर छापा मारीत २६ हजार ३६० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# संघटन सृजन अभियानांतर्गत काँग्रेसची जिल्हास्तरीय बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**

शहरातील सराफ बॅक्वेट हॉल येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने 'संघटन सृजन अभियान' अंतर्गत जिल्हास्तरीय बैठक पार पडली.

यावेळी आगामी राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे संघटन अधिक बळकट करण्यासाठी आणि बुथ पातळीपर्यंत कार्यकर्त्यांचे जाळे विस्तारण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते संजय चोकर यांनी विशेष उपस्थिती लावून मार्गदर्शन केले. यावेळी हिंगोली जिल्ह्याचे प्रभारी कल्याण दळे आणि जिल्हाध्यक्ष सुरेश आप्पा सराफ, सहप्रभारी साहेबराव कांबळे, अशोक पाटील, शहराध्यक्ष मिलींद उबाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीला जिल्ह्यातील काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विविध कृषी पुरस्काराचे अर्ज १५ एप्रिलपर्यंत सादर करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**

महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यात दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी करण्यात येतो.

यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार यांचा समावेश आहे. सदर पुरस्कार माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते प्रदान करून संबंधितांचा गौरव करण्यात येतो. यापूर्वी हे पुरस्कार अर्ज ऑफलाईन पद्धतीने स्वीकारले जात होते. मात्र, प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलन प्रक्रियेत होणारा विलंब तसेच शेतकऱ्यांना होणारा खर्च लक्षात घेता ही प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व वेळबद्ध करण्यासाठी कृषी विभागामार्फत स्वतंत्र ऑनलाईन संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे. ही प्रणाली कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून 'कृषी पुरस्कार' या टॅबमध्ये अर्ज सादर करता येणार आहेत.

प्रणालीद्वारे अर्ज सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन व अहवाल निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविण्यात येणार असून यामुळे कार्यक्षमता व विश्वासार्हता वाढणार आहे.

सन २०२५ साठी विविध कृषी पुरस्कार अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत आता दि. १५ एप्रिल २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. इच्छुक शेतकरी, व्यक्ती, संस्था व गट यांनी दिलेल्या मुदतीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद परिसरातील हनुमान मंदिरात महाप्रसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**

शहरातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद परिसरातील हनुमान मंदिरामध्ये आज हनुमान जयंतीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतल्याने मंदिर परिसरात मोठी गर्दी पाहायला मिळाली.

सकाळच्या सत्रात हनुमान जन्मोत्सवानिमित्त मारुतीरायाची विधीवत पूजा आणि महाआरती करण्यात आली. यावेळी 'जय श्रीराम' आणि 'पवनपुत्र हनुमान की जय' च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. मंदिराला आकर्षक फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आली होती. दुपारनंतर आयोजित करण्यात आलेल्या विशाल महाप्रसाद कार्यक्रमात सामाजिक सलोख्याचे दर्शन घडले. या महाप्रसादाचा लाभ शासकीय कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा परिषद व बांधकाम विभागातील कर्मचारी, परिसरातील नागरिक व शहरातून आलेले हजारो भाविकांनी घेतला. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उत्सव अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. केवळ शासकीय कर्मचारीच नव्हे, तर सामान्य जनतेनेही या सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. हनुमान जयंतीनिमित्त आयोजित या धार्मिक कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

# नगर पंचायत हद्दीत खुली जागा उपलब्ध करून देण्याची मागणी




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ एप्रिल**

औंढा तालुक्यातील डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने नगरपंचायत हद्दीतील खुली जागा उपलब्ध करून देण्याची मागणी नगराध्यक्ष कपील खंदारे यांचेकडे करण्यात आली आहे.

निवेदनात औंढा नागनाथ वैद्यकीय असोसिएशन ही नोंदणीकृत संस्था असून ती सामाजिक आरोग्यविषयक तसेच विविध सामाजिक उपक्रम नियमित राबवत असते. या उपक्रमांसाठी स्वतंत्र इमारत असणे आवश्यक असल्याने नगरपंचायत हद्दीतील प्लॉटिंगमधील नगरपंचायतीच्या मालकीची खुली जागा संस्थेला देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यासाठी सुमारे ३० बाय ४० स्क्वेअर फूट जागा देण्याची विनंती करण्यात आली.या निवेदनावर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. विलास खरात, डॉ मुकेश पवार, डॉ. सुरेश गंगावणे, डॉ. सीमा देशपांडे, डॉ. हरीश ऋषी डॉ. दत्ता सावळे, डॉ. प्रवीण सोनी, डॉ. भिकूलाल अग्रवाल, डॉ. पांडुरंग राठोड, डॉ. रघुनाथ बेंगाळ, डॉ. नवनाथ कुटे, डॉ. शिवशंकर राठोड, डॉ. अभिषेक जयस्वाल,डॉ. विमलकुमार बोरा, डॉ. सत्यनारायण अग्रवाल, डॉ. नागनाथ मस्के, डॉ. नागेश उदगीरे, डॉ. नारायण काचगुंडे, डॉ. उद्धव सोळंके, डॉ. रामप्रसाद काचगुंडे यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या असून आहेत. डॉक्टर असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कामाची मंजुरी एकीकडे आणि प्रत्यक्षात काम मात्र दुसरीकडे

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर, दि. ३ एप्रिल -**

लघुपाटबंधारे विभागाच्या माध्यमातून इस्लापूर येथील इस्लापूर किनवट हायवे रोडवरील पूल ते कोसमेट रेल्वे ब्रिज या दोन किलोमीटर अंतरावरील नाल्याच्या सरळीकरणासाठी करण्यासाठी जिल्हा विकास निधीच्या माध्यमातून लाखो रुपयांच्या निधीची मंजुरी प्राप्त झाली. सदरील नाल्यावर सरळीकरणाच्या कामास संबंधित गुत्तेदारांनी सुरुवात केली पण या नाल्यांमध्ये कुठेही दीड मीटर खोदकाम होत नसल्याने या नालासरळीकरणाच्या कामासाठी बाहेरून मटेरियल वाहनाने आणावे लागणार व नाला सरळीकरणासाठी टाकावे लागणार त्यामध्ये आपणास काही उरणार नाही हे गुत्तेदारास कळाल्यानंतर त्या गुत्तेदारांनी एक आगळीवेगळी शक्कल लढवली. व मंजूर असलेल्या नाल्यावरील काम प्रत्यक्षात बंद करून टाकले. व अचानकरीत्या ज्या नाल्याची सरळीकरण दोन वर्षांपूर्वी करण्यात आले होते त्या नाल्याकडे जेसीबी घेऊन आपला मोर्चा वळवल्याचे एक चर्चेचा विषय बनला. स्वतः गुत्तेदारांनी आपला पैसा वाचवण्यासाठी व अगोदरच झालेल्या नालासरळीकरण केलेल्या नाल्यावर काम करून पैसा झटपट कमवण्यासाठी या मार्गाचा अवलंब केल्याचे प्रत्येक्षात पहावयास मिळाल्याचे जिवंत उदाहरण



आज घडीला इस्लापूर जनतेस पहावयास मिळत आहे? एकाच रात्रीत मंजूर असलेल्या नाल्याचे काम बंद करून प्रत्येक्षात दुसऱ्या नाल्यावर च्या कामाला कशा पद्धतीने मंजुरी मिळाली हे सुद्धा न उलगडणारे कोडे आहे ?

**आदीवासी दुर्गम भागात असे प्रकार**

रातोरात कामाच्या जागेची अदलाबदल करून त्या ठिकाणी तात्काळ दुसऱ्या कामांना मंजुरी देण्याचे धाडस हे किनवट विभागाच्या अधिकाऱ्याने केले हे नवलच म्हणावे लागेल. प्रत्यक्षात कामाची अदलाबदल झालेल्या ठिकाणी कुठलेही नाला सरळीकरण करण्याच्या कामाचा फलक पहावयास मिळाला नाही अंदाजे त्यासाठी किती रक्कम मंजूर झाले हे सुद्धा पहावयास मिळाले नाही कुठेही शासकीय कामांना मान्यता मिळाली असताना व काम चालू करत असताना त्या ठिकाणी त्या कामाचे नाव फलक व अंदाजीत रक्कम नमूद केलेला फलक लावणे अपेक्षित असते पण या नाला सरळीकरण करण्याच्या कामांमध्ये कुठेही हे फलक पाहाव्यास मिळाले नाही महाराष्ट्रात अद्याप पर्यंत कुठेही अशी घटना ऐकावयास मिळाली नाही पण प्रत्यक्षात आदिवासी दुर्गम भाग असलेल्या किनवट तालुक्यात ही घटना पाहावयास मिळाली.

**इस्लापूर येथील नालासरळीकरण कामाचे चौकशीची मागणी**

**गुत्तेदार व अभियंत्यांचा पैसे कमविण्याचा नवीन फंडा**

एकंदरीत एका रात्रीत कामाची अदलाबदल करून दुसरीकडे मंजुरी देणाऱ्या त्या अभियंत्यास शासनाच्या माध्यमातून खुद मुख्यमंत्र्याच्या हस्ते पारितोषिक देण्यात यावे व खऱ्या अर्थाने कर्तव्यदक्ष असणाऱ्या व एक मुखाने भ्रष्टाचार करण्यासाठी मूकसंमती देणाऱ्या या अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात यावा अशा स्वरूपाची मागणी सुद्धा या निमित्ताने या आदिवासी भागातून समोर येत आहे. अशाच पद्धतीचे या अभियंत्याने बनावट कामी कुठे कुठे करण्यास गुत्तेदारांना प्रोत्साहन दिले हे सुद्धा शोधणे आता गरजेचे बनले आहे. रातोरात गुत्तेदार व अभियंते मालामाल बनण्याचा हा नवीन तर फंडा नाही ? ना अशा स्वरूपाची चर्चा या निमित्ताने तालुका भर ऐकावयास मिळत आहेत. संबंधित गुत्तेदार व अभियंताची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशा स्वरूपाची मागणी यानिमित्ताने जनतेमधून पुढे येत आहे.

## मुदखेडचा तरुण राजू हावळे बेपत्ता

**मुदखेड-** शहरातील भीमनगर भागातील रहिवासी असलेले राजू देवराव हावळे हे मागील दोन दिवसांपासून बेपत्ता झाले असून त्यांचा सर्वत्र शोध घेऊनही अद्याप त्यांचा कोणताही पत्ता लागलेला नाही. याप्रकरणी कुटुंबातील सदस्यांनी चिंता व्यक्त केली असून कोणालाही माहिती मिळाल्यास संपर्क साधण्याचे नम्र आवाहन केले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, राजू हावळे हे दि. ३ मार्च २०२६ रोजी बारड येथून ऑटोने दुपारी १:३० वाजताच्या सुमारास मुदखेड येथे आले होते. मुदखेडात आल्यानंतर त्यांनी आपल्या एका ऑटो चालक मित्राला जेवणासाठी हॉटेलमध्ये सोबत चलण्यास सांगितले. मात्र, मित्राला काम असल्याने त्याने येण्यास असमर्थता दर्शवली. त्यानंतर राजू हावळे हे एकटेच जेवण करण्यासाठी शहरातील रेल्वे अंडर ब्रिजच्या दिशेने पायी गेले. त्यावेळेपासून ते अद्याप घरी परतले नाहीत. नातेवाईकांनी मित्र परिवार, नातेवाईक आणि सर्व संभाव्य ठिकाणी त्यांची शोध मोहीम राबवली, परंतु अद्याप कोणतीही माहिती हाती लागलेली नाही. राजू देवराव हावळे याचे वय ३५ वर्ष, उंची ६ फुट, रंग सावळा,शर्ट पांढरा,निळी जीन्स या वर्णाबद्दल कोणालाही काही माहिती मिळाल्यास किंवा ते कुठे दिसल्यास खालील संपर्क क्रमांक: ९९२१५८४५३३ या क्रमांकावर त्वरित संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## देशहित आणि जनसेवेचा संकल्प; भाजप स्थापना दिनानिमित्त केराम यांचे आवाहन

**किनवट-** भारतीय जनता पक्षाच्या ४४ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून भाजपचे खंबीर नेतृत्व भीमराव केराम यांनी पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधला. पक्षाची विचारधारा ही केवळ राजकारण नसून ती राष्ट्रसेवेचे माध्यम आहे, अशा शब्दांत त्यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. यावेळी बोलताना आमदार भीमराव केराम म्हणाले की, आज भारतीय जनता पक्ष जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे, याचे संपूर्ण श्रेय हे बूथ स्तरावर अहोरात्र कष्ट करणाऱ्या कार्यकर्त्यांना जाते. सामान्य माणसाच्या सुख-दुःखात धावून जाणारा कार्यकर्ता हीच पक्षाची खरी ताकद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने राबवलेल्या लोककल्याणकारी योजनांचा उल्लेख करत केराम यांनी सांगितले की, उज्ज्वला योजना, किसान सन्मान निधी आणि आयुष्मान भारत यांसारख्या योजनांमुळे गरिबांच्या जीवनात परिवर्तन आले आहे. या योजनांचा लाभ प्रत्येक गरजू व्यक्तीला मिळवून देणे हीच खऱ्या अर्थाने पक्षाची सेवा ठरेल. 'एकात्म मानववाद' हाच आमचा आत्मा पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला 'एकात्म मानववाद' आणि 'अंत्योदय' अर्थात शेवटच्या माणसाचा उदय हा विचार घेऊनच आपल्याला पुढे जायचे आहे. समाजातील वंचित, शोषित आणि पीडित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

## नांदेडमध्ये आज राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ४ एप्रिल -**

शिक्षणाचे वाढते खाजगीकरण आणि बाजारीकरण यामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये मोठे बदल होत असून शिक्षण ही सेवा न राहता नफ्याचे साधन बनत चालले आहे. खाजगी शाळांमधील वाढत्या शुल्कामुळे सर्वसामान्यांना शिक्षण घेणे कठीण झाले असून यामुळे शैक्षणिक विषमता वाढत आहे. गुणवत्तेपेक्षा आर्थिक क्षमता महत्त्वाची ठरत असल्याने शिक्षण क्षेत्रात कॉर्पोरेट वर्चस्व वाढत असल्याची चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. उच्च शिक्षणासमोरील प्रमुख आव्हानांमध्ये दर्जेदार शिक्षणाची कमतरता, वाढता खर्च, बाजाराधिष्ठित शिक्षण पद्धती, कालबाह्य अभ्यासक्रम, अंधश्रद्धांना चालना, संशोधनाचा अभाव, अपुऱ्या पायाभूत सुविधा तसेच ऑनलाईन शिक्षणातील डिजिटल दरी या बाबींचा समावेश होतो. या सर्व परिस्थितीचा विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावरही मोठा परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर चौथ्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन नांदेड येथे करण्यात आले आहे.

भारतीय पिछडा शोषित संघटन, लसाकम, सप्तरंगी साहित्य मंडळ आणि बीसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील शिवाजीनगरस्थित हॉटेल विसावा पॅलेसच्या कॉन्फरन्स हॉल, येथे आज रविवार दिनांक ५ एप्रिल २०२६, रोजी सकाळी १०:०० वाजता चौथ्या राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे उद्घाटन होईल. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गोविंद रामदिनेवार हे राहणार असून उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे उपस्थित राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक नेते डी. एम. हनुमंते यांची उपस्थिती लाभणार आहे. ही परिषद तीन सत्रांमध्ये पार पडणार आहे. पहिल्या सत्रात शिक्षणाचे बाजारीकरण आणि बहुजन समाजावर होणारे दुष्परिणाम या विषयावर फारूक अहमद मार्गदर्शन करतील. या सत्राचे अध्यक्ष एस. जी. माचनवार असून प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अमोल काळे उपस्थित राहतील. दुसऱ्या सत्रात उच्च शिक्षणासमोरील आव्हाने या विषयावर प्रा. डॉ. दिलीप चव्हाण आपले विचार मांडतील. या सत्राचे अध्यक्ष डॉ. हेमंत कार्ले असून प्रमुख उपस्थिती कॉ. उज्वला पडलवार व ॲड. एस. एम. गोरे यांची राहणार आहे.

नांदेडमधील जास्तीत जास्त नागरिक, शिक्षणप्रेमी व विद्यार्थ्यांनी या परिषदेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## आदिवासींवर अन्याय होऊ देणार नाही : आ.भीमराव केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ४ एप्रिल -**

आदिवासी पेसा शिरपूर शिवारात निर्माण होणाऱ्या स्टोन क्रेशर प्रकल्पाला आजूबाजूच्या आदिवासी शेतकऱ्यांचा विरोध आहे. या स्टोन क्रेशर ला वीज पुरवठा करण्यासाठी नियमबाह्य पद्धतीने आदिवासीच्या शेतात विजेचे बारा खंबे रातोरात उभे केले.यासाठी आदिवासी शेतकऱ्यांची साधी परवानगी किंवा संमती सुद्धा घेण्यात आली नाही. बेकायदेशीर काम करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरवर गुन्हा दाखल झाले याविषयीं आज मांडवीचे सरपंच सुमनबाई पेंदोर व माजी सरपंच कमलबाई पेंदोर यांच्या शिष्टमंडळाने आज आ.भीमराव केराम यांची भेट घेऊन सर्व वृत्तांत सांगितले त्यामुळे क्रेशर चे प्रकरण आ. केराम यांच्या कोर्टात आले. आदिवासी हा जल, जंगल,जमीन चा मालक असून त्याच्या किंवा त्याच्या मालमत्तेवर कुणी जबरदस्ती अन्याय करीत असेल तर ते होऊ देणार नाही



अशी स्पष्ट भूमिका आ.भीमरावजी केराम यांनी मांडली व या बाबत उप विभागीय अधीकारी, तहसीलदार, वीज वितरणसह संबंधित अधिकाऱ्यांशी बोलूत असे आश्वासन दिले.

शिष्टमंडळात सरपंच सुमनबाई पेंदोर, माजी सरपंच कमल बाई पेंदोर, ग्रा.प. सदस्य रेणुका राजू कुडमिते, कौसल्याबाई रमेश मेश्राम, विमलबाई तुकाराम मेश्राम, विनोद मेश्राम, संजय मडावी, प्रतीक मेश्राम, कोसबा मेश्राम इत्यादी आदिवासी बांधव उपस्थित होते.

स्टोन क्रेशरच्या रोज उडणाऱ्या प्रचंड धुळीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापिकी होतील पिके नष्ट होतील. वायू व ध्वनी प्रदूषण वाढून पर्यावरणाचा व शेतकऱ्यांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होईल. ब्लास्टिंग मुळे लिंगी तांड्यातील घरांना तडे जाणार त्यामुळे हा प्लांट अन्यत्र हलवावे एवढीच आमची मागणी आहे अन्यथा जिल्हाधिकारी नांदेड यांच्या कार्यालयापुढे कुटुंबासह आमरण उपोषण करण्यात येईल असा निर्णय मांडवीच्या आदिवासी बांधवांनी घेतला.

## घरकुल लाभार्थ्यांना पहिला आर्थिक हप्ता द्या; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. ४ एप्रिल -**

मुदखेड शहरातील घरकुल योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना अद्याप पहिला आर्थिक हप्ता मिळालेला नसल्यामुळे अनेक कुटुंबांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शहरातील सर्व पात्र लाभार्थ्यांना तात्काळ पहिला आर्थिक हप्ता मंजूर करून वितरित करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष मोहम्मद बुरहान अब्दुल मजीद यांनी नगर परिषदचे मुख्याधिकारी जगदीश दळवी यांची भेट घेत निवेदन सादर केली आहे.

यासंदर्भात त्यांनी मुदखेड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शासनाच्या घरकुल योजनेतून अनेक गरजू कुटुंबांना घर बांधण्यासाठी मंजुरी मिळाली असली तरी प्रत्यक्षात पहिला आर्थिक हप्ता मिळण्यात मोठा विलंब होत आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी घरबांधणीसाठी केलेली तयारी रखडली असून त्यांच्यावर आर्थिक ताण वाढत आहे.

घरकुल योजना ही शासनाची अत्यंत महत्त्वाची योजना असून गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना घर उपलब्ध करून देण्याचा तिचा उद्देश आहे. मात्र पहिला हप्ता वेळेत न मिळाल्याने अनेक लाभार्थ्यांचे नियोजन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन मुदखेड शहरातील सर्व पात्र लाभार्थ्यांना तात्काळ पहिला आर्थिक हप्ता मंजूर करून वितरित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने या मागणीची दखल न घेतल्यास संबंधित लाभार्थ्यांसोबत लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

**निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यात : जगदीश दळवी**

मुदखेड नगरपरिषदेच्या हद्दीतील प्रधानमंत्री आवास योजना (PMY 2.0) अंतर्गत एकूण ३९२ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी १७७ लाभार्थ्यांचे पहिले हप्त्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आले असून ६० लाभार्थ्यांचे दुसऱ्या हप्त्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत.शासनाच्या नव्या धोरणानुसार आता हे निधी वितरण थेट PMY Housing मंत्रालय मार्फत लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

लोकप्रतिनिधी तसेच नगरपरिषदेने लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा होणेसाठी सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केली आहे. परिणामी, आता लाभार्थ्यांना निधी थेट त्यांच्या खात्यात मिळत असून यामुळे पारदर्शकता वाढली आहे तसेच निधी वितरण प्रक्रियेला गती मिळाली आहे. नगरपरिषद भविष्यातही लाभार्थ्यांना वेळेत व पारदर्शक पद्धतीने लाभ मिळावा यासाठी कटिबद्ध असल्याचे मुख्याधिकारी जगदीश दळवी म्हणाले.

## भिम जयंतीनिमित्त सिडकोत रोषणाई व रस्ते दुरुस्तीची मनपा आयुक्ताकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३ एप्रिल -**

भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सिडको-हडको नवीन नांदेड परिसरात विद्युत रोषणाई, स्वच्छता मोहीम व रस्त्यांची तात्काळ डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडीचे सम्राट आढाव यांनी सिडकोतील समाज बांधवांच्या वतीने एका निवेदनाद्वारे मनपाचे अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार व मनपाचे महापौर कविताताई मुळे यांच्याकडे दिनांक १ एप्रिल रोजी करण्यात आली.




महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक सिडकोतील मुख्य रस्त्याने काढली जाते. यावेळी हजारो नागरिक अभिवादनासाठी उपस्थित राहतात. त्यामुळे जयंतीपूर्वी परिसराची सुयोग्य तयारी करण्याची मागणी वंचित बहुजन युवा आघाडीचे सम्राट आढाव यांनी मनापाचे आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी केली आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, गुरुवार बाजार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क परिसरात एलईडी फोकस लाईट, विद्युत रोषणाई, स्वच्छता व सुशोभीकरण करण्यात यावे. तसेच लातूर फाटा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व माता रमाई आंबेडकर चौक परिसर रंगरंगोटी करून स्वच्छ करण्यात यावा, अशी मागणी केली आहे.

यासोबतच वस्ताद लहुजी साळवे नगर, वाघाळा हडको ते सिडको परिसरातील मुख्य रस्त्यांची तात्काळ डागडुजी करून मजबुतीकरण करावे व बंद असलेले सर्व स्ट्रीट लाईट सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच सिडको-हडको परिसरातील सर्व बुद्ध विहार व स्मारक परिसरात महानगरपालिकेमार्फत विद्युत रोषणाई करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.भिम जन्मोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेसह स्वच्छ व प्रकाशमान वातावरण उपलब्ध करून देण्याची अपेक्षा स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## उमरीत कैलास गोरठेकर आणि उद्योजक कवळे गुरुजी यांच्यात राडा

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि. ४ एप्रिल -**

जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक पदासाठी ठराव सेवा सहकारी सोसायटीचा बिन विरोद्ध ठराव घेण्यासाठी उमरीत गोरठेकर व कवळे गुरुजी गटात राडा झाला असून उमरीच्या राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे .

उमरी नगरपरिषद व खरेदी विक्री संघ निवडनुकीत गोरठेकर यांच्ये बहुमताने विजयाचे वर्चस्व मिळाले आहे. आमदार .कै बाबासाहेब देशमुख गोरठेकर यांच्या काळात बिनविरोद्ध ठरावानुसार निवडणूक होत होत्या त्याच धर्तीवर कांही काळ आ . कै बापुसाहेब देशमुख गोरठेकर काळात झाल्या पण युती असतांना नांदेड जिल्हात गोरठेकर विरुद्ध अशोकराव चव्हाण असे समिकरण प्रत्येक निवडणूकीत चालूच होते . परवाच्या नगर परिषद निवडवूकीत राष्ट्रवादी गोरठेकर उमरी के डी बॉस यांचा विजयाचा जयजयकार झाल्याने उदोजक कवळे गुरुजी आणि कैलास गोरठेकर यांच्या कार्यकर्ते मध्ये वाद झाल्याने दोन्ही गटात शाब्दिक चकामक धापड बुक्याचे घटना घडली होती दोन्ही गटाचे व्हिडीओ व्हॉयरस झाले होते परंतु वरिष्ट राजकीय नेत्याच्या सत्लानुसार दोन्ही पार्टीचे गटनेते त्या घटनेला पुर्णविराम दिला होता . . आता हीच निवडणूच अटीतटीची होत असून उमरी तालुक्यातील सेवा सहकारी सोसायटी सदस्यानां बनवा बनवी व पळवा पळवी करून पुन्हा गोरठेकर विरुद्ध कवळे गुरुजी राजकीय रणनिती हा चर्चेचा विषय बनला असुन कोणला वाड्यावर तर कोणाला गोवा तर कोणाला देवदर्शन नेण्याचा अटीतटीचा प्रकार सुरू झाल्याने ठराव घेण्यावरून वाद निर्माण झाला आहे हिरडगाव - उमरी खरेदी विक्री संघातील एका मतदारांसाठी गोरठेकर विरुद्ध राजकीय संघर्ष पेटला असून तु तु मै मै असा राडा झाला आहे अशी चर्चा तालुक्यात जोरदार सुरु आहे.

## भव्य हिंदू संमेलनाचे आज आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ४ एप्रिल -**

सकल हिंदू समाज विसावानगर, बी.के. हॉल परिसर, पाटनूरकरनगर, कैलासनगर, सहयोगनगर, अशोकनगर, उदयनगर, भाग्यनगर यांच्या वतीने रविवार, दि. ५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ ते ७.३० या वेळेत प्रतिभा निकेतन हायस्कूल मैदान, कैलासनगर नांदेड येथे भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी प्रमुख वक्ते सुभाष जोशी-बीड (प्रांत सहसचिव सेवाभारती) यांचे सखोल मार्गदर्शन लाभणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून वे.शा.सं. विश्वासशास्त्री घोडजकर, संचालक श्री दुर्गा वेद पाठशाळा नांदेड यांचेही मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थिती दर्शवावी, असे आवाहन संयोजक सकल हिंदू समाज यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील ओपन जिमचे साहित्य दुरुस्त; दिलीप ठाकूर यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ४ एप्रिल -**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या ओपन जिममधील नादुरुस्त साहित्य अखेर दुरुस्त करण्यात आले असून, धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला आहे. याबद्दल अमरनाथ यात्री संघातर्फे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांचे आभार मानण्यात आले, तर जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांचा सत्कार करण्यात आला.*

दरवर्षीप्रमाणे यंदाही अमरनाथ यात्रेकरूंच्या चालण्याचा व प्राणायामाचा सराव संघाचे अध्यक्ष दिलीप ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीराम सेतू, गोवर्धन घाट येथे घेतला जात आहे. येत्या ३ जुलै रोजी होणाऱ्या २७ व्या अमरनाथ यात्रेसाठी जाणारे यात्रेकरू मागील एक महिन्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सराव करत आहेत. मात्र, येथे ओपन जिमचे साहित्य नादुरुस्त असल्याने नियमित व्यायाम करणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत होती.ही बाब लक्षात येताच दिलीप ठाकूर यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना लेखी निवेदन देऊन तसेच निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांची चार वेळा प्रत्यक्ष भेट घेऊन तातडीने कारवाईची मागणी केली.

जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी आवश्यक ती कार्यवाही केली. ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर हनुमान जयंतीच्या दिवशी ओपन जिममधील सर्व नादुरुस्त साहित्य दुरुस्त करण्यात आले.यामध्ये एअर वॉकर, सायकलिंग मशीन, ट्विस्टर, पुल-अप बार, लेग प्रेस, सीट-अप बेंच, सिंगल-डबल बार, बेंच प्रेस आदी साहित्यांचा समावेश आहे. या कार्याबद्दल जयकुमार टेंभरे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी मदनेश्वरी व सुभाष देवकते, साईप्रसाद व गौरी, राम भुतडा, मंगला व नामदेव पांचाळ, मिरा येवले, रामदास मुदिराज, मेधा पिंपरखेडे, रजनी फुलारी, निता उपलंचवार, अनिता माळोदे, श्वेता वट्टमवार, बालाजी शिंदे, प्रकाश नागेश्वर, ज्ञानू गुरव, प्रकाश जालणेकर, सुभाष कोटा, मनोज यांनी सत्कार केला.

कार्यक्रमात योग शिक्षिका उर्मिला साजणे व जगन्नाथ अमिलकंठवार यांनी पावसाळ्यात योगाभ्यासासाठी शेड उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.सत्काराला उत्तर देताना जयकुमार टेंभरे यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मैदानात दररोज व्यायाम करणाऱ्यांची वाढती संख्या लक्षात घेता लवकरच आणखी एक ओपन जिम संच बसविण्यात येईल. तसेच नागरिकांनी आपल्या पाल्यांना क्रीडा क्षेत्राकडे वळवावे, जेणेकरून नोकरीतील क्रीडा राखीव जागांचा लाभ घेता येईल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर अंकरला यांनी केले, तर आभार अर्जुन हुरणे यांनी मानले. यावेळी प्रणाली जिल्हेवार, अनिता गोडबोले, संजय बुजुर्गे, संतोष कॅंद्रकुंटे, विजय केला यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. ओपन जिमचे साहित्य दुरुस्त करण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याबद्दल दिलीप ठाकूर यांचे सत्यभामा व रामकृष्ण चक्रावार, अरुण रेणके, सुरेखा शर्मा, राजश्री शर्मा, राजश्री हुरणे, गायत्री मेहता, शोभा व नारायणसिंह चौहान, राम पाठक, वंदना चव्हाण, मिना व विश्वनाथ झुंझारे, शर्मिला व प्रशांत होट्टे, छाया व अशोक दलपे, प्रशांत जोशी, पिंटू बियाणी यांच्यासह नियमित वॉकिंगसाठी येणाऱ्या नागरिकांकडून विशेष कौतुक करण्यात येत आहे.

## रियलमी १६ ५जी स्मार्टफोन लॉंच

छत्रपती संभाजीनगर, ३ एप्रिल २०२६ – रियलमी कंपनीने भारतीय बाजारपेठेत Realme 16 5G हा नवा स्मार्टफोन लॉन्च केला आहे. ७००० एमएएच क्षमतेची मोठी बॅटरी आणि आकर्षक डिझाइन ही या फोनची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. या स्मार्टफोनमध्ये एआय-आधारित ड्युअल ५० मेगापिक्सेल पोर्ट्रेट कॅमेरा देण्यात आला असून, ५० मेगापिक्सेल फ्रंट कॅमेरा आणि सोनी IMX852 सेन्सरसह ५० मेगापिक्सेल रिअर कॅमेरा उच्च दर्जाचे फोटो काढण्यास सक्षम आहे. कमी प्रकाशातही स्पष्ट आणि नैसर्गिक फोटो मिळावेत यासाठी विशेष तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. ६.५७ इंचाचा डिस्प्ले, अतिनार बेजेल आणि हलके वजन यामुळे हा फोन वापरण्यास सोयीस्कर ठरतो. ८.१ मिमी जाडी आणि १८३ ग्रॅम वजन असूनही मोठी बॅटरी देण्यात आली आहे. हा स्मार्टफोन एअर व्हाईट आणि एअर ब्लॅक या रंगांमध्ये उपलब्ध असून, किंमत ₹३१,९९९ पासून सुरू होते. ग्राहकांना विविध बँक ऑफर्स आणि ईएमआय पर्यायांचा लाभ घेता येणार आहे.

## ‘तुम से तुम तक’ मालिकेत ‘शोले’ला हटके आदरांजली

छत्रपती संभाजीनगर - झी टीव्हीवरील ‘तुम से तुम तक’ ही मालिका रोचक कथानकामुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. अलीकडेच मालिकेत ‘शोले’ चित्रपटातील एका अजरामर प्रसंगाला आधुनिक आणि हलक्याफुलक्या शैलीत सादर करण्यात आले. हा प्रसंग आर्य आणि अनु यांच्या कथेत सहजपणे गुंफला गेला असून त्यातून नॉस्टॅल्जिया आणि ताजेपणा दोन्ही अनुभवायला मिळतो. निहारिका चौक्सीने या सीनचे चित्रीकरण आनंददायी असल्याचे सांगितले. अशा सर्जनशील प्रयोगांमुळे मालिकेतील भावनिक आणि मनोरंजक बाजू अधिक प्रभावी होत असून प्रेक्षकांची उत्सुकता कायम राहते.

## ‘लिव्ह इट लार्ज’ या नव्या मोहिमेची घोषणा

नवी दिल्ली: सीग्राम्स रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने ‘लिव्ह इट लार्ज’ या नव्या ब्रँड मोहिमेची घोषणा केली. ब्रँडच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा दर्शवणारी ही मोहीम आजच्या पिढीचा — ‘जनरेशन लार्ज’चा — निर्भय आणि व्यक्त होणारा दृष्टिकोन जिवंत करते, जी यशाच्या मार्गांना नव्याने परिभाषित करण्याचा प्रयत्न करते. या मोहिमेत विविध क्षेत्रांतील सहा आयकॉन्स — रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह, बादशाह, सिद्धार्थ मल्होत्रा, नागा चैतन्य आणि पायल धरे — सहभागी आहेत. प्रत्येक जण ब्रँडच्या ‘लिव्ह इट लार्ज’ तत्त्वज्ञानातील निर्भयता आणि आत्मविश्वास दर्शवतो.

## छत्रपती संभाजीनगर मध्ये पहिले ‘सिंपल स्टोअर’ सुरू

छत्रपती संभाजीनगर, 2 एप्रिल 2026: भारतातील होम-ग्रोन ऑटोमोटिव्ह कंपनी सिंपल एनर्जीने महाराष्ट्रातील आपला रिटेल विस्तार करत छत्रपती संभाजीनगरमध्ये पहिले ‘सिंपल स्टोअर’ सुरू केले आहे. पीएसपी टेक्नोकॅड ॲन्सिलरी प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सहकार्याने हा 914 चौ. फूटचा स्टोअर सुरू केला गेला आहे. यासोबतच केवळ 500 मीटर अंतरावर 1,000 चौ. फूट क्षेत्रफळाचे पूर्ण सुविधांनी सुसज्ज सर्व्हिस सेंटरही सुरू करण्यात आले आहे. कंपनी ग्राहकांना सोयीस्कर विक्रीनंतरची सेवा आणि उत्तम ग्राहक अनुभव देण्यासाठी स्टोअर आणि सर्व्हिस सेंटर एकत्र सुरू करत आहे. आधुनिक आणि ग्राहकांना लक्षात घेऊन तयार केलेले हे स्टोअर उत्तम ब्रँड अनुभव देते. येथे सिंपल एनर्जीच्या विविध उत्पादनांचे प्रदर्शन आहे, ज्यामध्ये नवीन ‘सिंपल वन जेन 2’ मॉडेलचा समावेश आहे. हे मॉडेल दोन बॅटरी पर्यायांमध्ये उपलब्ध आहे.

## डेटॉलने सुरू केली एक नवीन मोहीम

छत्रपती संभाजीनगर : भारताचा आघाडीचा जंतूनाशक ब्रँड 'डेटॉल'ने त्यांच्या नामांकित डेटॉल अँटीसेप्टिक लिक्वीडसाठी एक नवीन भावूक मोहीम सुरू केली आहे. ही मोहीम ब्रँडचे कुटुंबांशी असलेले नाते अधिक घट्ट करण्यासाठी आणि डेटॉलचे अतुलनीय संरक्षण अधोरेखित करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. आईच्या मुलांप्रती असलेल्या नैसर्गिक काळजीच्या जागतिक सत्यावर आधारित ही मोहीम, “आई आणि डेटॉलसारखे संरक्षण दुसरे कोणीही देऊ शकत नाही” हा विचार मांडते. पिढ्यानपिढ्या, डेटॉल हे केवळ एक उत्पादन नसून संकटाच्या काळात एक आधार देणारे सोबती बनले आहे. ही नवीन फिल्म लग्नाच्या घरातील धावपळीच्या वातावरणात एका हळव्या क्षणाद्वारे हा भावनिक गाभा मांडतो. लग्नाच्या गडबडीत एका लहान मुलाला दुखापत होते आणि तो स्वतःला शूर दाखवण्यासाठी आपली जखम इतरांपासून लपवून ठेवतो.

## विवो ने वीवो वी70 एफई सादर केला

पुणे- विवो ने भारतात आपला नवीन स्मार्टफोन वीवो वी70 एफई सादर केला आहे, जो प्रीमियम डिझाइन, प्रगत कॅमेरा आणि दमदार परफॉर्मन्स यांचा संतुलित अनुभव देतो. ₹37,999 पासून सुरू होणाऱ्या किमतीत उपलब्ध असलेला हा स्मार्टफोन वी सीरीजच्या नाविन्यपूर्ण परंपरेला पुढे नेतो. वीवो वी70 एफई मध्ये 200मपी ओआईएस अल्ट्रा-क्लिअर मुख्य कॅमेरा देण्यात आला आहे, जो उत्कृष्ट तपशील, स्थिरता आणि कमी प्रकाशातही स्पष्ट फोटो टिपण्यास सक्षम आहे. एआई फोटोग्राफी सूटमुळे वापरकर्त्यांना एआई मॅजिक वेदर, एआई इरेज 3.0, एआई यूएचडी आणि एआई कलर ॲडजस्टमेंटसारखी स्मार्ट टूल्स मिळतात, ज्यामुळे फोटो एडिटिंग अधिक सोपे आणि प्रभावी होते.

## देशभरात घरगुती एलपीजी विक्री सुरळीत सुरू

जागतिक ऊर्जा बाजारावर चालू भौगोलिक-राजकीय परिस्थितीचा परिणाम होत असला, तरी भारतातील एलपीजी पुरवठा स्थिर, पुरेसा आणि सतत निरीक्षणाखाली आहे. घरगुती एलपीजीला सर्वाधिक प्राधान्य दिले जात आहे. इंडियन ऑइल कडून घरगुती एलपीजीचा पुरवठा सुरळीत सुरू आहे. सध्या दररोज सुमारे 28 लाख गॅस सिलिंडर वितरित केले जात आहेत, जे भौगोलिक-राजकीय तणाव पूर्वीच्या नेहमीच्या पातळीप्रमाणे आहेत. ग्राहकांनी गॅस रिफिल बुक करण्यासाठी एसएमएस आणि आयव्हीआरएससारख्या डिजिटल पद्धतींचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सध्या सुमारे 87% बुकिंग डिजिटल माध्यमातून होत आहेत. तसेच सिलिंडर योग्य ग्राहकांपर्यंत पोहोचावा यासाठी डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड द्वारे गॅस वितरण केले जात आहे.

## फॅटी लिव्हर आजार: शांत धोका जो लिव्हर फेल्युअरपर्यंत पोहोचू शकतो

नाशिक: मेटाबॉलिक डिसफंक्शनशी संबंधित स्टिएटोटिक लिव्हर डिजीज – म्हणजेच लिव्हरमध्ये अल्कोहोलशी संबंधित नसलेली चरबी (फॅट) जास्त प्रमाणात साठणे – भारतात वेगाने एक गंभीर आरोग्य समस्या बनत आहे. विशेषतः लठ्ठपणा, मधुमेह आणि इतर मेटाबॉलिक समस्या वाढत असल्याने या आजाराचा धोका अधिक वाढला आहे. हा जगभरातील सर्वात सामान्य क्रॉनिक लिव्हर आजारांपैकी एक असून टाइप 2 मधुमेह, उच्च रक्तदाब, असामान्य कोलेस्ट्रॉल आणि वाढते वजन यांच्याशी याचा घनिष्ठ संबंध आहे. नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या इंस्टिट्यूट ऑफ लिव्हर, इंटेस्टाइन अँड पॅन्क्रियास सायन्सेसचे लिव्हर व मल्टी-ऑर्गन ट्रान्सप्लांट डायरेक्टर, डॉ. गौरव चौबल म्हणाले, “ मेटाबॉलिक डिसफंक्शनशी संबंधित स्टिएटोटिक लिव्हर डिजीज चे वेळेवर व्यवस्थापन किंवा उपचार करण्यात सर्वात मोठे आव्हान म्हणजे फॅटी लिव्हर आजार दीर्घकाळ कोणतीही स्पष्ट लक्षणे न दाखवता राहतो. अनेकांना लिव्हरची समस्या आहे हे नुकसान मोठ्या प्रमाणात झाल्यावरच कळते. सुरुवातीच्या टप्प्यात लिव्हरमध्ये केवळ चरबी साठते आणि ही अवस्था सौम्य असू शकते, पण काही प्रकरणांमध्ये हा आजार गंभीर होऊन सूज, फायब्रॉसिस (स्कारिंग) आणि कालांतराने सिरोसिस किंवा लिव्हर कॅन्सरपर्यंत पोहोचू शकतो. अभ्यासांनुसार, लिव्हरमधील स्कारिंगचे प्रमाण भविष्यातील धोका दर्शवणारा महत्त्वाचा घटक आहे.”

# अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या क्षमतावृद्धीसाठी ‘महा-साधना सप्ताह’; 8 एप्रिलपर्यंत व्यापक प्रशिक्षण मोहीम

### iGOT कर्मयोगी भारत’वर किमान ४ तासांचे शिक्षण पूर्ण करण्याचे आवाहन



**छत्रपती संभाजीनगर, दि. 4 |** शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्षमतावृद्धीसाठी केंद्र शासनाच्या ‘मिशन कर्मयोगी’ अंतर्गत २ ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत ‘महा-साधना सप्ताह’ राबविण्यात येत असून, या उपक्रमात विभागातील सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

भारत सरकारचा क्षमता विकास आयोग (CBC) आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या विशेष प्रशिक्षण उपक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ‘iGOT कर्मयोगी भारत’ पोर्टलवर लॉग इन करून किमान ४ तासांचे अभ्यासक्रम पूर्ण करावेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय यंत्रणेला अधिक कार्यक्षम, तंत्रज्ञानस्नेही आणि परिणामकारक बनविणे हा आहे. डिजिटल गव्हर्नन्स, वेळ व्यवस्थापन, निर्णयक्षमता वाढविणे, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित साधनांचा प्रभावी वापर या बाबींवर विशेष भर देण्यात येणार आहे.

“सतत नवीन शिकणे आणि स्वत:ला अद्ययावत ठेवणे ही काळाची गरज आहे. महासाधना सप्ताह हा अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या गुणवत्तावृद्धीसाठी मोठी संधी आहे. सर्वांनी नियोजनबद्ध पद्धतीने सहभाग नोंदवून यशस्वी करावा,” असे पापळकर यांनी नमूद केले.


या सप्ताहात सहभागी होत असताना अधिकारी व कर्मचारी आपले नियमित कामकाज सांभाळूनच ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण करणार असल्याने कामकाजावर कोणताही परिणाम होणार नाही, तर उलट कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी केला.

यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे तीन अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना ‘एआय दक्ष’ बॅज, तर मार्केटप्लेसवरील विस्तारित अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना ‘कर्मयोगी उत्कर्ष’ बॅज देण्यात येणार आहे. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विभागांना ‘TECH-वारी 2.0’ मध्ये सन्मानित करण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हे, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर शासकीय कार्यालयांनी या उपक्रमात १०० टक्के सहभाग सुनिश्चित करून विभागाची कामगिरी अधिक भक्कम करावी, असेही आवाहन श्री. पापळकर यांनी केले आहे.

## दक्षिण काशीत नवनाथ प्रगट दिन साजरा

तभा वृत्तसेवा



**पैठण दि ०४ |** दक्षिणकाशीतील जुन्या पैठण मधील प्राचीन नवनाथ गुफा मंदिरात चैत्र कृष्ण द्वितीया शुभ- पर्वावर नवनाथ प्रगट दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भक्तांनी नवनाथ प्रतिमेवर पुष्पवष्टी करून नवनाथांचा जयजयकार करण्यात आला.

यश पळसकर यांच्या हस्ते नवनाथांचा अभिषेक पुरोहित वसंत पूर्णपात्रे यांच्या मंत्र उच्चारात करण्यात आला.

पैठण येथे नवनाथांनी जमिनीच्या आतील गुफेत तपसाधना केल्याची लोकभावना असल्यामुळे याठिकाणी नवनाथ भक्त मोठया प्रमाणात दर्शनासाठी येतात. रतिश मगरे ,रुद्राक्ष दाभाडे, बबलू हिंगे, वरूण कामाठी, योगेश भावसार , साहेबराव रोकडे , परमानंद दाभाडे, सुभाष घोडके ,मधुकर कुलकर्णी , दीपक मस्के ,नाना दाभाडे , दया इनामदार , सुभाष काळे , आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. सदरील गुफा मंदिर हे जीर्ण झाले असून या मंदिराचा जीर्णोद्धार खासदार संदिपान भुमरे आमदार विलास भुमरे यांच्या पुढाकाराने होत आहे

## हिंदूधर्म टिकवण्यासाठी आपण आपल्या संस्कृतीचे पालन करा : स्वामी अरुणा नाथ गिरीजी महाराज



तभा वृत्तसेवा

खुलताबाद दि ४ एप्रिल श्री क्षेत्र वेरूळ येथील नाथ आश्रम या ठिकाणी दि २ एप्रिल ते ८ एप्रिल पर्यंत दररोज सायंकाळी ७ ते ९ या दरम्यान नाथ आश्रम प्रमुख साध्वी नाथ योगिनी अक्का महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शना खाली श्री क्षेत्र आडबंगनाथ संस्थान मठपती अरुणात गिरीजी महाराज यांच्या मुखातून संगीत नवनाथ कथेचे आयोजन करण्यात आले आहे कथेसाठी भव्य दिव्य मंडप आलेल्या भक्तासाठी चहा नाष्टा दुपारचे जेवण सायंकाळ चे जेवण संपूर्ण व्यवस्था फक्त मंडळाकडून करण्यात आली असून या सेवेचा सर्वांनी लाभ घेऊन कथा श्रावण करून आपल्या जीवनातील सर्व व्यथा दूर झाल्याशिवाय राहणार नाही असे महाराष्ट्रभरातून आलेल्या सर्व भक्तांना उपदेश करताना सांगितले

अडबंगनाथ संस्थान मठपती स्वामी अरुणा नाथ गिरीजी महाराज कथे दरम्यान आलेल्या सर्व भाविकांना आपली हिंदू संस्कृती टिकवण्यासाठी एक संघ रहा आई-वडिलांना दैवत माणूस सेवा करा प्रत्येक गावोगावी धार्मिक कार्यासाठी अन्नदानासाठी दान धर्म करा. मोबाईलचा वापर कमी करा हिंदू ग्रंथांची वाचन करा असे कथे दरम्यान भाविकांना उपदेश करताना सांगितले

## भजन स्पर्धेत स्वरवेलू महिला भजनी मंडळ आणि रांगोळी स्पर्धेत ज्ञानदा इंग्लिश स्कूल ने प्रथम क्रमांक पटकावला

### सिडको हडको नववर्ष स्वागत समिती तर्फे भजन आणि रांगोळी स्पर्धेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर |** सिडको हडको हिंदू नववर्ष स्वागत समितीतर्फे मागील पंचवीस वर्षापासून रांगोळी स्पर्धेचे आणि कॉलनी ची गुढी कॉलनी ची रांगोळी व महिला भजन स्पर्धेचे आयोजन केले जाते.

या स्पर्धांना पुरुष आणि महिला मधून उस्फूर्त प्रतिसाद मिळतो. किराडपुरा श्री राम मंदिर येथे दिनांक 22 मार्च 2026 रविवार रोजी संपन्न झालेल्या भजन स्पर्धेत 27 महिला संघाने सहभाग नोंदवला..तसेच वर्षप्रतिपदेला गुढीपाडव्याच्या दिवशी कॉलनीची गुढी कॉलनी ची रांगोळी या स्पर्धेत 4 संघांनी सहभाग नोंदवला.

या दोन्ही स्पर्धांचा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम टीव्ही सेंटर जवळील कालिका माता मंदिरात दिनांक 3 एप्रिल 2026 शुक्रवारी सायंकाळी 6 वाजता संपन्न झाला.



भजन स्पर्धेत प्रथम क्रमांक स्वरवेलु महिला भजनी मंडळ द्वितीय क्रमांक विश्वजीत भजनी मंडळ तृतीय क्रमांक महारुद्र भजनी मंडळ,आणि चतुर्थ क्रमांक स्वरा भजनी मंडळ.. तसेच रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक ज्ञानदा इंग्लिश स्कूल द्वितीय क्रमांक जल्लोष ग्रुप तृतीय क्रमांक भारत माता शिवसे मंडळ चतुर्थ क्रमांक जय बजरंग मंडळ एन 7 सिडको या सर्वांना रोख रक्कमसह,स्मृतिचिन्ह व सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले तसेच काही संघांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.

भजनी मंडळाचे स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. सुधीर बहिरगावकर श्री निरंजन भालेराव आणि सौ स्नेहा कुलकर्णी यांनी काम पाहिले. बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या सुरुवातीला हिंदू नववर्ष स्वागत समितीचे उपाध्यक्ष श्री.एस. एम. कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित कायम देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री.राजेशजी बूटोले यांचे स्वागत, स्वागत समितीचे अध्यक्ष व प्राध्यापक श्री.प्रवीणजी वक्ते यांनी केले.

व्यासपीठावरील सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. स्वागत समितीचे सहसचिव श्री उदय काहाळेकर यांनी आभार प्रदर्शन केले.. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. निर्मला बडवे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता पसायदान आणि महाप्रसादाने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. उदय कहाळेकर श्री.शिवाजी दहिवाळ श्री.लक्ष्मण आर्य, सुधीर पोतदार, जयाजी पवार,सुरेश जोशी राहुल झाला यांनी मेहनत घेतली.

# २१ गोवंशीय जनावरांची सुटका, ५१० किलो मांस जप्त

छत्रपती संभाजीनगर, ४ एप्रिल : छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई करत कत्तलीसाठी नेल्या जाणाऱ्या २१ गोवंशीय जनावरांची सुटका केली असून, ५१० किलो गोमांस जप्त करण्यात आले आहे. कासंबरी दर्गा परिसरातील एका गोदामात जनावरांना अमानुषपणे कोंबून ठेवून कत्तल सुरू असल्याचे उघडकीस आले.

या प्रकरणी छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, चार आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. पोलिसांनी मनोज भालेराव याला अटक केली आहे.

ही कारवाई पोलिस उपनिरीक्षक दिनेश बन यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली. गुन्हे शाखा आणि छावणी पोलिसांनी संयुक्तपणे छापा टाकला. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच चार आरोपी अंधाराचा फायदा घेत पळून गेले.

ही कारवाई पोलिस आयुक्त प्रवीण पवार आणि पोलिस उपायुक्त रत्नाकर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक गजानन कल्याणकर तसेच इतर पोलिस कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

या छाप्यात सुमारे १४ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात १० लाख ५० हजार रुपये किमतीची २१ जिवंत गोवंशीय जनावरे, १ लाख २ हजार रुपये किमतीचे ५१० किलो मांस, एक लोडिंग रिक्षा, तीन दुचाकी तसेच कत्तलीसाठी वापरण्यात येणारी शस्त्रे यांचा समावेश आहे.

पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून फरार आरोपींचा शोध घेतला जात आहे.

## बेपत्ता माजी पोलिस अधिकाऱ्याचा विहिरीत मृतदेह सापडला; आत्महत्येचा संशय

छत्रपती संभाजीनगर, ४ एप्रिल (हिं.स.) : छत्रपती संभाजीनगर येथील बाळापूर शिवारात बेपत्ता झालेल्या सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक भीमराव कारभारी घुगे (६२) यांचा मृतदेह कोरड्या विहिरीत आढळून आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. घुगे हे शहर पोलिस दलातून उपनिरीक्षक पदावरून सेवानिवृत्त झाले होते. सेवेच्या अखेरीस ते क्रांती चौक पोलिस ठाण्यात कार्यरत होते. सेवानिवृत्तीनंतर ते कधी बीड बायपासवरील मुलाकडे, तर कधी बाळापूर शिवारातील घरी राहत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, घुगे हे मुलीला भेटण्यासाठी बाळापूर परिसरात गेले होते. त्यानंतर ते शहराकडे निघाले, मात्र अचानक बेपत्ता झाले. कुटुंबीयांनी त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांनी कॉल किंवा संदेशांना प्रतिसाद दिला नाही.

दरम्यान, बाळापूर शिवारातील एका कोरड्या विहिरीत व्यक्ती पडल्याची माहिती चिकलठाणा पोलिस यांना मिळाली. घटनास्थळी तपास केला असता, तो मृतदेह घुगे यांचा असल्याचे स्पष्ट झाले.

घटनास्थळी त्यांची दुचाकी विहिरीपासून काही अंतरावर आढळून आली. तसेच दुचाकीच्या डिक्कीत दोरीही सापडल्याने आत्महत्येचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

## 1 मेपासून डिजिटल जनगणना ; 3,800 कर्मचारी नियुक्त

**छत्रपती संभाजीनगर |** केंद्र शासनाच्या निर्देशानुसार छत्रपती संभाजीनगर शहरात महाराष्ट्र दिनापासून (१ मे) जनगणनेचे काम सुरू करण्यात येणार आहे. या मोहिमेसाठी महापालिकेचे सुमारे ३,८०० कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, त्यांचे प्रशिक्षण सध्या सुरू आहे. विशेष म्हणजे, यंदाची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे.

जनगणनेचा पहिला टप्पा एक महिन्याचा असेल. या कालावधीत शहरातील घरांची मोजणी केली जाणार आहे. पहिल्या १५ दिवसांत नागरिकांना शासनाच्या ॲपच्या माध्यमातून स्वतः नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. १ ते १५ मेदरम्यान नागरिकांनी आवश्यक माहिती भरून नोंदणी करावी लागणार आहे.

या मोहिमेचे नेतृत्व महापालिकेचे उपायुक्त विकास नवाळे करत असून, त्यांच्याच मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यानंतर नियुक्त कर्मचारी घरोघरी जाऊन घरांना क्रमांक देण्याचे काम करतील.

शहरात जनगणनेसाठी १० ब्लॉक तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक ब्लॉकमध्ये अंदाजे १२० ते १४० घरांचा समावेश असेल. शासनाकडून उपलब्ध करून दिलेल्या ॲपमध्ये एकूण ३३ प्रश्न असतील, ज्यांची उत्तरे नागरिकांना द्यावी लागतील.

जनगणनेच्या कामासाठी सुमारे साडेतीन हजार कर्मचाऱ्यांची आवश्यकता असताना, खबरदारी म्हणून १० टक्के अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्यामुळे एकूण कर्मचाऱ्यांची संख्या ३,८०० पर्यंत पोहोचली आहे.

# गंगापूर तालुक्यात ८ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीची तयारी सुरू

छत्रपती संभाजीनगर, 04 एप्रिल (हिं.स.) : राज्यात ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुका जाहीर झाल्या आहेत. यात गंगापूर तालुक्यातील ८ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. थेट सरपंचांच्या ३ आणि सदस्यांच्या ९ रिक्त जागांसाठी एकूण १३ जागांवर पोटनिवडणूक होणार आहे.

निवडणूक प्रक्रिया ३० मार्चपासून सुरू झाली असून, २८ एप्रिल रोजी मतदान आणि २९ एप्रिल रोजी मतमोजणी पार पडेल. रिक्त जागा सदस्य अथवा सरपंचांच्या निधन, राजीनामा किंवा इतर कारणांमुळे तयार झाल्या आहेत.

गंगापूर तालुक्यातील काही प्रमुख जागा आणि कारणे अशी आहेत:

टाकळी कदिम व खडक नारळा – अतिक्रमणामुळे रिक्त

दिघी – सरपंचाचा राजीनामा

पिंपरखेडा – सदस्यांच्या ३ जागा

टाकळी कदीम – सदस्यांच्या २ जागा

नंद्राबाद, पुरी, देवळी व शिरजगाव – प्रत्येकी सदस्यांच्या १ जागा

नामनिर्देशनपत्र विक्री व सादरीकरण ७ ते १३ एप्रिल दरम्यान होईल. १५ एप्रिल रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी, तर १७ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. त्याच दिवशी उमेदवारांना निवडणूक चिन्ह देण्यात येईल.

मतदान सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत होईल, तर मतमोजणी २९ एप्रिल रोजी पार पडणार आहे.

## एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडियाने 10 लाखाहून अधिक एसी विक्रीचा टप्पा गाठला

नवी दिल्ली: एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया (एलजीई इंडिया) ने आज २०२६ च्या पहिल्या तिमाहीत १० लाखाहून अधिक एअर कंडिशनर्सच्या विक्रीची घोषणा केली. ही ऐतिहासिक उपलब्धी भारतातील कंपनीच्या इतिहासातील उन्हाळी हंगामाची सर्वात वेगवान आणि मजबूत सुरुवात आहे. हा माईलस्टोन केवळ एलजीई इंडियाची काम करण्याची उत्कृष्ट क्षमता आणि सप्लाय चेनची गती दर्शवत नाही, तर भारताच्या वेगाने वाढणाऱ्या आणि अत्यंत स्पर्धात्मक एअर कंडिशनर बाजारपेठेत एक भक्कम लीडर म्हणून तिचे स्थान अधिक मजबूत करतो.या यशाचा एक मुख्य चालक हंगामाच्या बराच काळ आधी आपले नवीन बीईई स्टार-रेटेड निकषांचे पालन करणारे एसी लाइन-अप लॉंच करण्याबाबतचा एलजीई इंडियाचा 'फर्स्ट-मूव्हर' फायदा होता, ज्यामुळे हे सुनिश्चित झाले की रिटेल पार्टनर्स आणि ग्राहक कोणत्याही अडथळ्याशिवाय प्रगत, ऊर्जा-कार्यक्षम उत्पादने सहजपणे स्वीकारू शकतील. याला पूरक म्हणून, आयसीसी विश्वचषकादरम्यान एलजीई इंडियाच्या मार्केटिंग मोहिमेने मोठ्या प्रमाणावर शानदार पोहोच आणि ग्राहक सहभाग मिळवून दिला, ज्यामुळे अभूतपूर्व ब्रँड प्रसिद्धी आणि खरेदीची इच्छा वाढली.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हील एम.ए. क्र.२२४/२०२६

अर्जदार : १) संजय महावु शेटे, वय ४७ वर्षे धंदा शेती, रा. रामराई ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) परशुराम पि. गोकुळ शेटे, वय १२ वर्षे धंदा शिक्षण, ३) कु. पुजा पि. गोकुळ शेटे, वय १४ वर्षे धंदा शिक्षण, अर्जदार क्र.२ व ३ करीता अज्ञान पालन कर्ता अर्जदार क्र.१

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण:_ वारसहक्क कायदा कलम ३७२ नुसार वारसाहक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.ई पठाण यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की,

अर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.२ व ३ यांचा चुलता आहे. अर्जदार क्र.१ ची आई व अर्जदार क्र.२ व ३ यांची आजी (वडीलांची आई) नामे इंदुबाई महादु शेटे या दिनांक २६/११/२०२३ रोजी मौजे रामराई ता. गंगापुर येथे मयत झालेल्या असून अर्जदार क्र. १ चे वडील व अर्जदार क्र.२ व ३ यांचे आजोबा नामे महादु मारोती शेटे हे यापुर्वीच मयत झालेले आहे. मयत इंदुबाई यांना दोन मुले अर्जदार क्र.१ संजय व गोकुळ महादु शेटे असे होते, त्यापैकी गोकुळ महादु शेटे हे दिनांक २५/१०/२०१५ रोजी मयत झालेला असुन मयत गोकुळ महादु शेटे यांची पत्नी नामे अलका गोकुळ शेटे या दिनांक २७/१२/२०१३ रोजी मयत झालेल्या आहे. मयत इंदुबाई महावु शेटे यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत अर्जदार क्र.१ ची आई व अर्जदार क्र.२ व ३ यांची आजी नामे मयत इंदुबाई महादु शेटे यांचे नावे वाळूज एम आय डी सी वडगाव कोल्हाटी हद्दीत प्लॉट नं. PAP-238 क्षेत्रफळ १३८.०० चौ. मीटर मिळकत असुन सदर मिळकत ही अर्जदार क्र.१ चे नावे करणे कामी अर्जदार यांनी वरील अर्ज या न्यायालयात मयताचे वारसप्रमाणपत्र मिळणे कामी सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. प्रकरणात पुढील तारीख ०५/०५/२०२६ रोजीची आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०४/०४/२०२६ रोजी दिले आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर गंगापुर